**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. मनिष भगवानदास अग्रवाल, : अपीलकर्ता

संपादक साप्तहिक राजनिष्ठा, ए-५१, नाथनगर, सिंधी कॉलनी मागे, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी

विभागीय सह निबंधक, औरंगाबाद विभाग, लेखा परीक्षण सहकारी संस्था, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :

विभागीय सह निबंधक, औरंगाबाद विभाग, लेखा परीक्षण सहकारी संस्था, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३६९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २०-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. मनिष भगवानदास अग्रवाल | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>विशेष लेखा परीक्षक वर्ग-२, अधिन विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था (लेखापरीक्षण), औरंगाबाद<br>- श्री. काळे आर. बी. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विभागीय सह निबंधक, औरंगाबाद विभाग, लेखा परीक्षण सहकारी संस्था, औरंगाबाद - प्रतिनिधी - श्री. डी. एच. चव्हाण, प्रभारी विशेष लेखापरीक्षक वर्ग-२ | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०१-०९-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०७-१०-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०-१०-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८-०१-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी व  जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दिनांक २०-१०-२००९ रोजीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतल्याचे आढळून येत नाही.  या पार्श्वभूमीवर जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय सह निबंधक, औरंगाबाद विभाग, लेखा परीक्षण, सहकारी संस्था, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दिनांक २०-१०-२००९ रोजीच्या प्रथम अपिलाची सुनावणी घेणे आयोगास आवश्यक वाटते.  याकरिता सदरचे प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय सह निबंधक, औरंगाबाद विभाग, लेखा परीक्षण सहकारी संस्था, औरंगाबाद यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे.  त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक २०-१०-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन निर्णय घेणे आवश्यक आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय सह निबंधक, औरंगाबाद विभाग, लेखा परीक्षण सहकारी संस्था, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दिनांक २०-१०-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत सुनावणी घेऊन निर्णय पारीत करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २०-०४-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मनिष भगवानदास अग्रवाल, संपादक साप्तहिक राजनिष्ठा, ए-५१, नाथनगर, सिंधी कॉलनी मागे, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा विशेष लेखा परीक्षक वर्ग-२, अधिन विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था (लेखापरीक्षण), औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय सह निबंधक, औरंगाबाद विभाग, लेखा परीक्षण सहकारी संस्था, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. मोहमद अब्दुल फहीम, | : | अपीलकर्ता |
| फ्लॅट नं. २, स्नेहलता अपार्टमेंट, छत्रपती नगर, गारखेडा परिसर, औरंगाबाद | | |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| जन माहिती अधिकारी तथा | : | उत्तरवादी |
| लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, जलसंपदा विभाग कार्यालय, औरंगाबाद | | |
| जन अपिलीय अधिकारी तथा | : | |
| लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, जलसंपदा विभाग कार्यालय, औरंगाबाद | | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३७० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २०-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. मोहमद अब्दुल फहीम | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा | : | उपस्थित |
| | उपविभागीय अभियंता (तांत्रिक बाबी), मुख्य अभियंता व मुख्य प्रशासक, लाभक्षेत्र विकास, जलसंपदा विभाग, औरंगाबाद - श्री. शेख नाझर अली मोहम्मद उस्मान | | |
| ३.३ | जन माहिती अधिकारी तथा | : | उपस्थित |
| | विशेष अधीक्षक, (अतांत्रिक बाबी), लाभक्षेत्र विकास, जलसंपदा विभाग, औरंगाबाद | | |
| | - श्री. जी. जी. गादेवाड | | |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी तथा | : | उपस्थित |
| | सहायक मुख्य प्रशासक, मुख्य अभियंता व मुख्य प्रशासक, लाभक्षेत्र विकास, जलसंपदा विभाग, औरंगाबाद | | |

- श्री. अभय लक्ष्मणराव पाठक

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०७-०७-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. २७-०८-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १३-०१-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी (२) व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक ०७-०७-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागितलेली एकूण बारा मुद्दयांवरील ५८८ पृष्ठांची माहिती देण्यात आली आहे. त्यापैकी ४२१ पृष्ठांची माहिती सशुल्क देण्यात आली व उर्वरित माहिती नि:शुल्क देण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी ही बाब मान्य केली. तथापि काही माहिती अपूर्ण आहे असे त्यांनी आयोगास अवगत केले. ती खालीलप्रमाणे आहे.

१. मुद्दा क्रमांक ५ बाबत प्रतिनियुक्तीचे अर्ज मिळाले नाही, यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले की असे अर्ज त्यांच्याकडे नाहीत त्यामुळे ते देता येत नाहीत.

२. मुद्दा क्रमांक ६ बाबत सन २००७-२००८ या वर्षाची माहिती मिळाली नाही ती जन माहिती अधिकारी यांना द्यावी लागेल.

३. मुद्दा क्रमांक १, २, ३ व ४ यामध्ये काही माहितीच्या प्रती मिळाल्या नाहीत यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे सांगितले की, त्या उपलब्ध नाहीत. त्याप्रमाणे अपिलार्थीस कळविण्यात यावे.

४. मुद्दा क्रमांक ८ व ९ मधील २००७ ते २००९ या दोन वर्षाच्या कालावधीतील माहिती द्यावी असे सांगितले. याबाबत जी माहिती दिली नसेल ती जन माहिती अधिकारी यांना द्यावी लागेल.

वर नमूद केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांना ही माहिती अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाने द्यावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## <u>आदेश</u>

१. जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस देय असलेली माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २०-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मोहमद अब्दुल फहीम, फ्लॅट नं. २, स्नेहलता अपार्टमेंट, छत्रपती नगर, गारखेडा परिसर, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, मुख्य अभियंता व मुख्य प्रशासक, लाभक्षेत्र विकास, जलसंपदा विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा विशेष अधीक्षक, (अतांत्रिक बाबी), लाभक्षेत्र विकास, जलसंपदा विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक मुख्य प्रशासक, मुख्य अभियंता व मुख्य प्रशासक, लाभक्षेत्र विकास, जलसंपदा विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. किशोर विठ्ठलरव बाब्रस,<br>रा. बीड | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>प्रबंधक, जिल्हा न्यायालय, बीड | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा न्यायाधीश-१, जिल्हा न्यायालय,बीड | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/४३५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २०-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी -प्रबंधक, जिल्हा न्यायालय,बीड - श्री. ए. आर.वाघमारे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - जिल्हा न्यायाधीश क्र- १, जिल्हा न्यायालय,बीड | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १५.१०.२००८ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १३.११.२००८ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २०.११.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०८.१२.२००८ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२.०१.२००९ |

विचाराधीन द्वितीय अपिलावर दि. २१.०१.२०१० रोजी सुनावणी राज्य माहिती आयोगाच्या औरंगाबाद खंडपीठापुढे घेण्यात आली होती. या सुनावणीमध्ये राज्य माहिती आयोगाने जन माहिती अधिकारी यांना सूचित केले होते की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती उघड केल्यास निश्चितपणे अधिनियमातील कोणत्या कलमांचा भंग होतो, याबाबत शपथपत्राद्वारे स्पष्टीकरण

सादर करण्यात यावे. त्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी दि. २०.०४.२०११ रोजी आयोगास शपथपत्र सादर केले आहे.

आयोगास सादर करण्यात आलेली कागदपत्रे,शपथपत्र, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचा निर्णय व माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींचा साकल्याने विचार करता, जन अपिलीय अधिकारी यांनी घेतलेल्या निर्णयामध्ये कोणताही बदल करण्याची आवश्यकता आयोगास वाटत नाही.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २०-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. किशोर विठ्ठलरव बाब्रस,फ्लॅट नं. ९, माणिक अपार्टमेंट, सरपंच गल्ली,बीड

२. जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक, जिल्हा न्यायालय,बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा न्यायाधीश क्र- १, जिल्हा न्यायालय,बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. रविंद्र बळीराम मोरे,<br>रा. साळेगांव, पो. सांडस, तालुका कळमनुरी,<br>जिल्हा हिंगोली | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती कार्यालय, कळमनुरी, तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, हिंगोली | : | |
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/७९९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २०-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती कार्यालय, कळमनुरी, तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली - श्री. मुकाडे एम. आर. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, हिंगोली<br>- श्री. शिवाजी पवार | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २६-११-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १५-१२-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०-१२-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२-०३-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलाच्या अनुषंगाने दिनांक २८-०१-२०११ रोजी जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, हिंगोली यांच्या कक्षात त्यांच्या समोर सुनावणी झाली त्यावेळी अपिलार्थी आणि गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, कळमनुरी उपस्थित होते. सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने मागितलेली माहिती एकंदर ८३१३ पृष्ठे माहिती पुरविण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी ही माहिती समक्ष स्विकारली आहे व त्याची पोच दिली आहे. तसेच पंचायत समिती, कळमनुरी या कार्यालयातील कॅशबुक, विविध प्रकारचे अनुदान त्याचे अभिलेखे, शाळा बांधकामाची माहिती अशी विस्तृत माहिती मागितली आहे ती त्यांना दिनांक २९-०१-२००८ रोजी प्रत्यक्षात कार्यालयात पाहण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात आली व ती त्यांनी पाहिली आहे. जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, कळमनुरी यांनी ही माहिती विस्तृत स्वरुपात असल्यामुळे ती अपिलार्थीस पाहण्यासाठी उपलब्ध करुन दिली आहे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार योग्य ठरत आहे. या सर्व बाबी विचारात घेता आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २०-०४-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रविंद्र बळीराम मोरे, रा. साळेगांव, पो. सांडस, तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती कार्यालय, कळमनुरी, तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शेख अफसर शेख बाबु, : अपीलकर्ता
रा. नांदेड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
सचिव,
गोरक्षण संस्था, वजिराबाद, नांदेड
जन अपिलीय अधिकारी तथा :
सहायक धर्मादाय आयुक्त, नांदेड विभाग,नांदेड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१६३६ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २०-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २४.०८.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ११.०९.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ११.११.२००९ |

या प्रकरणाची सुनावणी दि. २८.१२.२०१० रोजी घेण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यापैकी कोणीही उपस्थित नव्हते. सुनावणीच्या वेळी दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत असल्यामुळे सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती. सदर प्रकरणाची सुनावणी आज घेण्यात आली. तथापि संबंधित अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वत: अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली किंवा कसे तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केला किंवा कसे याचा बोध होत नाही. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. ११.०९.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. याकरिता जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, नांदेड यांच्याकडे (अपिलार्थीने सादर केलेला मूळ अर्ज व त्यासंदर्भातील प्रथम व द्वितीय अपिलाच्या प्रतीसह) प्रकरण परत पाठविण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, नांदेड यांनी अपिलार्थीच्या दि.११.०९.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २०-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख अफसर शेख बाबु,रा. हमालपुरा मस्जीदजवळ, नांदेड-४३१ ६०२.

२. सचिव,गोरक्षण संस्था, वजिराबाद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, नांदेड विभाग,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात (अपिलार्थीने सादर केलेला मूळ अर्ज व त्यासंदर्भातील प्रथम व द्वितीय अपिलाच्या प्रतीसह)पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. विनयकुमार दिनकर नकाते, | : | अपीलकर्ता |
| रा. उस्मानाबाद | | |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा | : | उत्तरवादी |
| सचिव, | | |
| पंचाक्षरी शिवाचार्य ट्रस्ट, लातूर | | |
| जन अपिलीय अधिकारी तथा | : | |
| अध्यक्ष, पंचाक्षरी शिवाचार्य ट्रस्ट, लातूर | | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१६९१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २०-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०९.०४.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ३०.०४.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०४.०६.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०१.०७.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८.०७.२००९ |

या प्रकरणाची दि. २३.१२.२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली होती. सुनावणीच्यावेळी अपिलार्थी उपस्थित होते. जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. अपिलार्थीने सुनावणीच्यावेळी आयोगास मुदत देण्याकरिता विनंती केली होती. त्यांची विनंती मान्य करुन सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती व आज रोजी सुनावणी ठेवण्यात आलेली आहे. या सुनावणीस अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी उपस्थित राहावे,

असे अंतरिम आदेश दिले होते. तथापि आज रोजी कोणीही उपस्थित नाही. त्यामुळे प्रकरणाची सुनावणी पुनश्च पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे अन्यथा आयोगास उपलब्ध कागदपत्रांवरुन वस्तुनिष्ठ निर्णय घ्यावा लागेल, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २०-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. ॲड. विनयकुमार दिनकर नकाते, शिवाई निवास,गणेशनगर, उस्मानाबाद - ४१३ ५०१

२. जन माहिती अधिकारी तथा सचिव,पंचाक्षरी शिवाचार्य ट्रस्ट, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अध्यक्ष, पंचाक्षरी शिवाचार्य ट्रस्ट, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. विष्णू भगवानराव ढवळे,<br>ओंकार इलेक्ट्रॉनिक्स, ढोलेश्वर मंदिर परिसर, पैठण तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१६९३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २०-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, पैठण - श्री. भास्कर नारायण वाघ | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, तहसील कार्यालय, पैठण, जिल्हा औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.४ | उप विभागीय अधिकारी, औरंगाबाद यांचे प्रतिनिधी<br>- श्री. के. पी. विसपूते, अ. का. (म) | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०२-०१-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | | दि. ०५-०२-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २४-०२-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५-०५-२००९ |

या व्दितीय अपिलाची सुनावणी यापूर्वी दिनांक ०१-१२-२०१० व दिनांक ०४-०१-२०११ रोजी औरंगाबाद खंडपीठापुढे झाली होती. त्यावेळी आयोगाने दिलेल्या अंतरिम आदेशामध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रकरणात सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली आहे.

आज रोजी सुनावणीस अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व तत्कालीन जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक ०२-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागितलेली संपूर्ण माहिती उपलब्ध असून याबाबत अपिलार्थीस दिनांक २१-०१-२०१० रोजी पत्रान्वये कळविले आहे व ते पत्र प्राप्त झाल्याबाबतची पोच अपिलार्थीने दिलेली आहे. जन माहिती अधिकारी यांनी पुढे आयोगास असेही अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या अर्जामध्ये माहिती व्यक्तिशः पाहिजे आहे असे नमूद केले आहे. त्यांनी प्रतिसाद दिला नाही. अपिलार्थीस देण्याकरिता एकूण दोन बस्ते इतकी माहिती तयार असून ही माहिती अपिलार्थीने त्यांच्या कार्यालयात पाहिलेली आहेत. जन माहिती अधिकारी यांनी एकत्रित केलेल्या व अपिलार्थीस द्यावयाची माहितीचे दोन मोठे बस्ते आज आयोगाच्या सुनावणीत नजरेस आणून दिले यावर आयोगाने असे सूचित केले की, या सर्व माहितीचे मोठ्या साईजचे स्टॅप्लर मारुन पाच ते दहा संच तयार करावेत. म्हणजे कागदपत्रे गहाळ होणार नाहीत व खर्चही होणार नाही ही बाब विचारात घेता संच तयार करण्यात यावे प्रत्येक संचाच्या पृष्ठांच्या संख्येची नोंद ठेऊन ते अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार यांनी व्यक्तिशः हस्तांतरीत करावेत. ही सर्व कारवाई आयोगाचे आदेश प्राप्त होताच एका महिन्याच्या आत पूर्ण करावी.

अपिलार्थीने व्यक्तिशः माहिती मागितली असल्यामुळे ही माहिती तहसीलदार यांच्याकडून एका महिन्याच्या आत हस्तगत करण्याची जबाबदारी अपिलार्थी यांची राहील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

तहसीलदार, पैठण यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भातील कारवाई आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २०-०४-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विष्णू भगवानराव ढवळे, ओंकार इलेक्ट्रॉनिक्स, ढोलेश्वर मंदिर परिसर, पैठण तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, तहसील कार्यालय, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. नंदकिशोर शंकरराव कदम,<br>रा. उस्मानाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय),<br>पोलीस अधीक्षक कार्यालय,उस्मानाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर पोलीस अधीक्षक,<br>पोलीस अधीक्षक कार्यालय, उस्मानाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१७१५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २०-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपविभागीय पोलीस अधिकारी, उस्मानाबाद - प्रतिनिधी- श्रीमती एम.बी.तोटेवाड, पोलीस उपनिरीक्षक (ग्रा.) | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - अपर पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५.१०.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०७.१०.२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०.११.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १०.१२.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३.१२.२००९ |

या प्रकरणाची दि. २३.१२.२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली होती. त्यावेळी जन माहिती अधिकारी यांची सुनावणी पुढे ढकलण्याची विनंती मान्य करुन सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती व आज रोजी सुनावणी ठेवण्यात आलेली आहे.

आज रोजी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधी श्रीमती एम.बी.तोटेवाड, पोलीस उपनिरीक्षक उपस्थित आहेत. त्यांनी पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद यांचे दि.१८.०४.२०११ रोजीचे लेखी निवेदन आयोगास सादर केले असून यामध्ये,जन माहिती व अपिलीय अधिकारी कायदा व सुव्यवस्थेच्या बंदोबस्तामध्ये व्यस्त असल्यामुळे उपस्थित राहू शकत नाहीत, असे नमूद केलेले आहे. त्यामुळे प्रकरणाची सुनावणी पुनश्च पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे अन्यथा आयोगास उपलब्ध कागदपत्रांवरुन वस्तुनिष्ठ निर्णय घ्यावा लागेल, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २०-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नंदकिशोर शंकरराव कदम, सहायक पोलीस उपनिरीक्षक, पोलीस नियंत्रण कक्ष, उस्मानाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद यांना या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. हरीभाऊ विश्वनाथ कुरे, : अपीलकर्ता
रा. पुनंदगाव, ता.माजलगाव, जि.बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय,पुनंदगाव,ता.माजलगाव,जि.बीड
जन अपिलीय अधिकारी तथा :
विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती,
माजलगाव,जि.बीड

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१८३० | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २०-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ११.०५.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १६.०५.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०६.०७.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १७.०८.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १६.११.२००९ |

या प्रकरणाची दि. २१.१२.२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली होती. सुनावणीच्यावेळी अपिलार्थी अनुपस्थित होते. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित होते. त्यावेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले होते की, अपिलार्थीने मागितलेली संपूर्ण माहिती दि. ०७.०७.२००९ रोजी देण्यात आली आहे. अपिलार्थी त्यावेळी अनुपस्थित होते, त्यामुळे या

प्रकरणात त्यांचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत असल्यामुळे प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती. आज रोजी सुनावणी ठेवण्यात आली.

आज रोजी सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यापैकी कोणीही उपस्थित नाही. मागील सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी आयोगासमोर केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे यावरुन अपिलार्थीस माहिती मिळाल्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे. तथापि अपिलार्थीस माहिती देण्यास २६ दिवसांचा विलंब झाल्याचे दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी भविष्यात त्यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अर्जास विहित मुदतीत प्रतिसाद दिला जाईल, याची दक्षता घेणे आवश्यक राहील, अशी आयोगामार्फत सूचना देण्यात येत आहे.

सद्यस्थितीत अपिलार्थीस माहिती मिळाली आहे. या पार्श्वभूमीवर अपील निकाली काढण्यायोग्य आहे, असे आयोगाचे मत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी भविष्यात त्यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अर्जास विहित मुदतीत प्रतिसाद दिला जाईल, याची दक्षता घ्यावी, अशी आयोगामार्फत त्यांना सूचना देण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २०-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. हरीभाऊ विश्वनाथ कुरे, मु.पुनंदगाव, पो.ता.माजलगाव, जि.बीड

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,ग्रामपंचायत कार्यालय, पुनंदगाव, ता. माजलगाव, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, माजलगाव, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.		निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. अरुण रंगनाथ धोकटे,<br>रा. गंगापूर, जि.औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>गट शिक्षण अधिकारी,<br>पंचायत समिती, गंगापूर, जि.औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य),<br>जिल्हा परिषद, औरंगाबाद. | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१९५५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २०-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी -गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, गंगापूर, जि.औरंगाबाद - श्री. पंचगल्ले एस.एस. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि), जिल्हा परिषद, औरंगाबाद - प्रतिनिधी - श्री. बिऱ्हाडे एस.एस., विस्तार अधिकारी (सांख्यिकी) | : | उपस्थित |
| ३.४ | मुख्याध्यापक, प्रशाला, गंगापूर - श्री. नजन जी.जे. | : | उपस्थित |
| ३.५ | गट विकास अधिकारी, पंचायत समिती,गंगापूर - प्रतिनिधी - श्री. व्यास व्ही. के.,सहायक लेखाधिकारी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १३.०९.२००८ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ३१.१०.२००८ |

७ अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख दि. १९.१२.२००८

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १८.०२.२००९

या प्रकरणाची दि. ०१.०२.२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली होती. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित होते. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित होते. त्यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास विनंती केली की, सदरहू प्रकरणामध्ये सद्यस्थिती सादर करण्यासाठी मुदत देण्यात यावी. ती विनंती मान्य करुन सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती व आज रोजी सुनावणी ठेवण्यात आलेली आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पं.स.गंगापूर यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी एकूण १३ मुद्यांवर व्यक्तिशः माहिती मागितली होती. त्यातील देय होत असलेली संपूर्ण माहिती दि. १७.०२.२०११ रोजी देण्यात आलेली आहे व त्यासंदर्भात अपिलार्थीने पोच दिली आहे. अपिलार्थी हे त्यांच्या अधिनस्त प्रशाला, गंगापूर येथे शिक्षक या पदावर कार्यरत आहेत.

आयोगासमोर केलेला युक्तिवाद व सादर कागदपत्रे पाहता अपिलार्थीस माहिती मिळाल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २०-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अरुण रंगनाथ धोकटे,गोदावरी कॉलनी, गंगापूर, जि.औरंगाबाद - ४३१ १०९

२. जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, गंगापूर, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. किशोर भिकनसिंग राजपूत, : अपीलकर्ता
एन-६, सिडको, ई-२३/१०, संभाजी कॉलनी, नवीन औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना
जन अपिलीय अधिकारी तथा :
अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१९५६ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २०-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना - श्री. एस. एम. बोरोळे | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद - प्रतिनिधी - श्री. ए. आर. सरोदे, सहायक अधीक्षक अभियंता | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. १४-११-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १०-१२-२००८ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १८-१२-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २२-०१-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २०-०२-२००९ |

या व्दितीय अपिलाची सुनावणी यापूर्वी दिनांक ०१-०२-२०११ रोजी औरंगाबाद खंडपीठापुढे झाली होती. त्यावेळी अपिलार्थी उपस्थित होते व जन माहिती अधिकारी आणि जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित

होते. या सुनावणीमध्ये आयोगाने दिलेल्या अंतरिम आदेशानुसार या प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली आहे.

आज रोजी सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक १४-११-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागितलेली माहिती अपिलार्थीस द्यावयाची आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २२-०१-२००९ रोजी निर्णय देऊन संबंधितास १५ दिवसाच्या आत माहिती देण्यात यावी असा निर्णय पारीत केला आहे. अपिलार्थीस माहिती मिळाली किंवा कसे हे सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी आयोगास सांगू शकले नाहीत.

प्रकरणात संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आतापर्यंत माहिती पुरविलेली नाही व माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील अटी व नियमांचे पालन करण्यात कसूर केली आहे, असे आयोगास आढळून येत आहे. याव्दारे त्यांनी अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग केला आहे. त्यामुळे ते अधिनियमातील कलम २० (१) अन्वये रुपये २५,०००/- इतक्या शास्तीस पात्र ठरत आहेत, असे आयोगाचे मत झाले आहे व त्याबद्दल संबंधित जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे इतर सहायक अधिकारी / कर्मचारी यांना मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), पुणे यांचेमार्फत आयोगास खुलासा सादर करावा लागेल. या आदेशाची प्रत संबंधित तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना श्री. आर. जी. यादव व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे इतर सहायक अधिकारी / कर्मचारी यांना तामील होईल, असे अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद यांना पहावे लागेल. या सर्व बाबी पाहता, सचिव, जलसंपदा यांना या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची व तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना श्री. आर. जी. यादव व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे इतर सहायक अधिकारी / कर्मचारी यांच्याविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (२) अन्वये शिफारस करण्यात येतआहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

१. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेली माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

२. अपिलार्थीस माहिती पुरविण्यास विलंब झाला आहे. त्याकरिता तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना व अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्यास जबाबदार असलेले त्यांचे तत्कालीन इतर सहायक अधिकारी / कर्मचारी यांना एकत्रित रुपये २५,०००/- शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा हीच कारणे दाखवा नोटीस समजून त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, पुणे यांच्यामार्फत आयोगास सादर करावा. या आदेशाची प्रत सर्व तत्कालीन कार्यकारी

अभियंता / उप अभियंता व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे इतर सहायक अधिकारी / कर्मचारी यांच्यावर तामील करावयाची जबाबदारी अधीक्षक अभियंता यांची राहील.

३. सचिव (जलसंपदा) यांना या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची व तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना श्री. आर. जी. यादव व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे तत्कालीन इतर सहायक अधिकारी / कर्मचारी यांच्याविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २०-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. किशोर भिकनसिंग राजपूत, एन-६, सिडको, ई-२३/१०, संभाजी कॉलनी, नवीन औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. श्री. आर. जी. यादव, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी मार्फत अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद.

५. मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, म. रा. पुणे, येरवडा-६, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. सचिव (जलसंपदा), महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. शरद गणपत भोकरे,<br>एच आय जी-१ सेक्टर बी-८२, ठाकरे नगर, एन-२, सिडको, औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>तलाठी, सजा सातारा, तलाठी कार्यालय, सातारा, तालुका जिल्हा औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, औरंगाबाद | : | |
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१९६४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २०-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>तलाठी, सजा सातारा, तलाठी कार्यालय, सातारा,<br>तालुका जिल्हा औरंगाबाद - श्री. ए. एम. गोराडे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.४ | तत्कालीन जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, औरंगाबाद<br>- श्री. बालाजी क्षिरसागर | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १८-१२-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०२-०३-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९-०५-२००९ |

फेरसादर दिनांक
२९-१०-२००९

या व्दितीय अपिलाची सुनावणी यापूर्वी दिनांक ०१-०२-२०११ रोजी औरंगाबाद खंडपीठापुढे झाली होती. त्यावेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अथवा त्यांचे कोणीही प्रतिनिधी उपस्थित नव्हते. त्यामुळे प्रकरणात सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली आहे.

आज रोजी सुनावणीस अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व तत्कालीन जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, औरंगाबाद विशेष उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक १८-१२-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागितलेली माहिती अपिलार्थीस दिनांक २७-०५-२०१० रोजी देण्यात आली आहे व अपिलार्थीस ती प्राप्त झालेली आहे त्याबाबत अपिलार्थी यांनी त्याची पोच जन माहिती अधिकारी यांना दिलेली आहे. या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २०-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शरद गणपत भोकरे, एच आय जी-१ सेक्टर बी-८२, ठाकरे नगर, एन-२, सिडको, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा तलाठी, सजा सातारा, तलाठी कार्यालय, सातारा, तालुका जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. विकास कुमार बागडी, : अपीलकर्ता
नाथ गल्ली, सदर बाजार, जालना

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना
जन अपिलीय अधिकारी तथा :
अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१९७२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २०-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना - श्री. एस. एम. बोरोळे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद - प्रतिनिधी - श्री. ए. आर. सरोदे, सहायक अधीक्षक अभियंता | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८-१०-२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४-११-२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २२-१२-२००८ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९-०१-२००९ |

या व्दितीय अपिलाची सुनावणी यापूर्वी दिनांक ०२-०२-२०११ रोजी औरंगाबाद खंडपीठापुढे झाली होती. या व्दितीय अपिलाच्या माहिती अर्जासंदर्भात संबंधित अधिकारी यांचे दुर्लक्ष आतापर्यंत झालेले आहे आणि सध्याचे जन माहिती अधिकारी तसेच जन अपिलीय अधिकारी यांचा खुलासा मिळणे आवश्यक आहे.

म्हणून या प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली आहे. आज रोजी या प्रकरणाची पुन्हा सुनावणी घेण्यात येत आहे.

आज रोजी सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक ०८-१०-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागितलेली संपूर्ण माहिती त्यांनी तयार केली आहे आणि ते ती अपिलार्थीस देऊ शकतात. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाने अपिलार्थीस पाठवावी लागेल. तथापि या प्रकरणात संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आतापर्यंत माहिती पुरविलेली नाही व माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील अटी व नियमांचे पालन करण्यात कसूर केली आहे, असे आयोगास आढळून येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग केला आहे. त्यामुळे ते अधिनियमातील कलम २० (१) अन्वये रुपये २५,०००/- इतक्या शास्तीस पात्र ठरत आहेत, असे आयोगाचे मत झाले आहे व त्याबद्दल संबंधित जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे इतर सहायक अधिकारी / कर्मचारी यांना मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), पुणे यांचेमार्फत आयोगास खुलासा सादर करावा लागेल. या आदेशाची प्रत संबंधित तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना श्री. आर. जी. यादव व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे इतर सहायक अधिकारी / कर्मचारी यांना तामील होईल, असे अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद यांना पहावे लागेल. या सर्व बाबी पाहता, सचिव, जलसंपदा यांना या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची व तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना श्री. आर. जी. यादव व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे इतर सहायक अधिकारी / कर्मचारी यांच्याविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (२) अन्वये शिफारस करण्यात येतआहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

१. जन माहिती अधिकारी यांना वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत माहितीच्या प्रती विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवाव्यात.

२. अपिलार्थीस माहिती पुरविण्यास विलंब झाला आहे. त्याकरिता तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना व अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्यास जबाबदार असलेले त्यांचे तत्कालीन इतर सहायक अधिकारी / कर्मचारी यांना एकत्रित रुपये २५,०००/- शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा हीच कारणे दाखवा नोटीस समजून त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, पुणे यांच्यामार्फत आयोगास सादर करावा. या आदेशाची प्रत सर्व तत्कालीन कार्यकारी अभियंता / उप अभियंता व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे इतर सहायक अधिकारी / कर्मचारी यांच्यावर तामील करावयाची जबाबदारी अधीक्षक अभियंता यांची राहील.

३. सचिव (जलसंपदा) यांना या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची व तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना श्री. आर. जी. यादव व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे तत्कालीन इतर सहायक अधिकारी / कर्मचारी यांच्याविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २०-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

-----------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. विकास कुमार बागडी, नाथ गल्ली, सदर बाजार, जालना.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. श्री. आर. जी. यादव, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी मार्फत अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद.

५. मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, म. रा. पुणे, येरवडा-६, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. सचिव (जलसंपदा), महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अरुण नागनाथराव गिरी, : अपीलकर्ता
९८/१, स्वातंत्र्य सैनिक कॉलनी, लोकमान्य नगर, परभणी

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी
जन अपिलीय अधिकारी तथा :
अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१९८७ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २०-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी -<br>प्रतिनिधी - श्री. विकास बापटीकर, अ. का. | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०४-०३-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २५-०३-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०६-०४-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०५-०५-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १२-०६-२००९ |

या व्दितीय अपिलाची सुनावणी यापूर्वी दिनांक ०२-०२-२०११ रोजी औरंगाबाद खंडपीठापुढे झाली होती. त्यावेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. प्रकरणात वस्तुस्थिती आयोगास अवगत होऊ शकली नाही. सदर प्रकरणात अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांची बाजू ऐकून घेण्याच्या दृष्टीने सुनावणी पुढे ढकलण्यात येऊन ती आज रोजी ठेवण्यात आली आहे.

आज रोजी सुनावणीस अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक ०४-०३-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये परभणी येथील चार गॅस एजन्सीबाबत गॅसधारक व गॅसबाबत एकूण चार मुद्दयांवर माहिती मागितली आहे. गॅस एजन्सी कडील माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध होऊ शकत नाही कंपनीच्या केंद्रीय माहिती अधिका-याकडे माहिती उपलब्ध होऊ शकते. तथापि गंगा गॅस एजन्सी व शिवाजी गॅस एजन्सी या दोन गॅस एजन्सीतर्फे अपिलार्थीस माहिती मिळाली आहे. अपिलार्थी यांनी त्याची पोच दिलेली आहे. उर्वरीत दोन एजन्सीची माहिती त्यांना मिळाली नाही याकरिता आयोग असे सूचित करीत आहे की, सदरची माहिती ज्या केंद्रीय कार्यालयातील जन माहिती अधिका-याकडे उपलब्ध होईल याचा तपशील जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस द्यावा लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २०-०४-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अरुण नागनाथराव गिरी, ९८/१, स्वातंत्र्य सैनिक कॉलनी, लोकमान्य नगर, परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्रीमती भारती श्रीधरराव पोफळी, : अपीलकर्ता
रा.अंबाजोगाई, जि.बीड

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्याध्यापक,श्री योगेश्वरी नूतन विद्यालय,
अंबाजोगाई, जि.बीड
जन अपिलीय अधिकारी तथा :
शिक्षणाधिकारी (मा.), जिल्हा परिषद, बीड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/१९९१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २०-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| श्री. मोहनलाल अर्जुनदास शामनानी,<br>रा. प्लॉट नं. २४०, सतगुरु निवास, टिळकनगर, सिल्लोड, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, सिल्लोड,<br>तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय (महसूल), सिल्लोड, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३८० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २१-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, सिल्लोड,<br>तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद - श्री. महादेव किरवले | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय (महसूल), सिल्लोड, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०-०७-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १०-०८-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०-०९-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १५-१२-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११-०२-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक ३०-०७-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये जमिनीच्या अकृषिक नोंदीबाबत माहितीच्या प्रमाणित नक्कला मागितल्या आहे. याकरिता अपिलार्थी यांना दिनांक १०-०८-२००९ रोजीच्या पत्रान्वये रुपये १२० इतक्या शुल्काचा भरणा करावा असे लेखाशीर्षासह कळविण्यात आले. त्यानुसार दिनांक २५-०८-२००९ रोजी अपिलार्थीस बारा साक्षांकीत प्रमाणित प्रती पाठविण्यात आल्या आहेत. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास पुढे असेही सांगितले की, अशा प्रकारच्या प्रती देण्याकरिता त्यांच्या महसूल विभागातर्फे फी निश्चित करण्यात आली आहे.

माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार व महाराष्ट्र माहिती अधिकार नियम २००५ मधील कलम ४ (अ) (क) प्रमाणे संबंधित विभागाने माहितीच्या प्रती देण्याकरिता दर निश्चित केले असल्यास त्याप्रमाणे दर लावणे जरुरी आहे व त्याप्रमाणे कार्यवाही केल्याचे दिसून येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २१-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मोहनलाल अर्जुनदास शामनानी, रा. प्लॉट नं. २४०, सतगुरु निवास, टिळकनगर, सिल्लोड, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, सिल्लोड, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय (महसूल), सिल्लोड, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. गजानन बी.पाटील, : अपीलकर्ता
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नगर भूमापन अधिकारी, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
अधीक्षक,भूमी अभिलेख, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३८१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २१-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. गजानन बी.पाटील | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नगर भूमापन अधिकारी,औरंगाबाद - श्री. ब.ग.बांगर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख, औरंगाबाद- श्री. कि.रा.तवरेज | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८.०४.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६.०५.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २५.०९.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५.०२.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, विचाराधीन प्रकरणी अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे त्यांचे द्वितीय अपील सुमारे ४१

दिवस विलंबाने सादर केले आहे. सदरच्या विलंबाचे समर्थनीय कारण ते सुनावणीच्या वेळी देऊ शकले नाहीत. तरी एक विशेष बाब म्हणून हे द्वितीय अपील दाखल करुन सुनावणी पुढे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व आयोगापुढील कागदपत्रांवरुन आयोगास असे आढळून येत आहे की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती त्यांना आतापर्यंत देता आली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन माहिती द्यावी असा मोघम निर्णय दि. २५.०९.२००९ रोजी घेतलेला आहे. त्याऐवजी अपिलार्थीने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात त्यांनी मुद्देनिहाय उहापोह करुन अधिनियमाद्वारे देय असलेली माहिती देण्यासंबंधी जन माहिती अधिकारी यांना सूचना केली असती तर उचित राहिले असते व त्यानंतर जन माहिती अधिकारी यांना माहिती देणे सोयीचे झाले असते. यास्तव प्रकरण जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख, औरंगाबाद यांना अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर अधिनियमातील कलम ११ मधील तरतुदी विचारात घेऊन पुनश्च सुनावणी घेऊन अपिलार्थीच्या मूळ अर्जासंदर्भात मुद्देनिहाय विचार करुन दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून अधिनियमातील तरतुदीनुसार कारणमिमांसेसह निर्णय घ्यावा लागेल व त्याप्रमाणे निर्णय पारीत करावा लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख, औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत पुनश्च सुनावणी घेऊन आपला मुद्देनिहाय स्वयंस्पष्ट निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २१-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गजानन बी.पाटील,द्वारा श्री. किशोर अग्रवाल, २, तळमजला, गोमटेश मार्केट, अभ्युदय बँकेसमोर, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी, औरंगाबाद  यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. शिवाजी भाऊसाहेब बनकर,<br>रा.औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>उपअभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्या.,छावणी विभाग,औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्या.,शहर विभाग क्र.१,औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३८२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २१-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी -उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्या.,छावणी उपविभाग,औरंगाबाद - श्री. ए.एस.खडेकर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्या.,शहर विभाग क्र.१,औरंगाबाद- श्री. एस.एस.खंडारे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १९.११.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२.१२.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १०.०२.२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे, देवइंद्रायणी सहकारी गृहनिर्माण संस्था म.,शहानुरवाडी, बीड बायपास रोड, औरंगाबाद या सोसायटीमधील प्लॉट क्रमांक २,४,५,६,९,१८ व १९ या त्रयस्थ प्लॉटधारकांनी विद्युत कनेक्शनसाठी दिलेल्या मागणी अर्जासोबत जोडलेल्या सर्व कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती मागितल्या आहेत. या माहितीसाठी एकूण ₹ १६४/- चा भरणा करावा, असे दि. १६.१२.२००९ रोजी विहित मुदतीत कळविण्यात आले आहे. तथापि अपिलार्थीने शुल्काचा भरणा केलेला नाही. अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जान्वये व्यक्तिशः माहितीची मागणी केलेली आहे.जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेतलेली नाही. तथापि दि. २१.०१.२०१० रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस एकूण ८२ पृष्ठांची माहिती विनामूल्य कुरीअरद्वारे पाठविण्यात आली आहे. तथापि 'सापडले नाही', अशी नोंद करुन माहितीचे पाकीट त्यांच्याकडे परत प्राप्त झाले आहे. आयोगापुढील कागदपत्रांवरुन ही बाब आढळून येत आहे. अपिलार्थी यांनी व्यक्तिशः मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्या ताब्यात आहे. ही माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहून व्यक्तिशः हस्तगत करावी लागेल व जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थी त्यांच्या कार्यालयात उपस्थित झाल्यास ही माहिती अपिलार्थीस विनामूल्य हस्तांतरित करावी लागेल.ही बाब जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे कळवावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस वर नमूद केल्याप्रमाणे त्यांच्या कार्यालयात उपस्थित होताच अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती विनामूल्य हस्तांतरित करावी.ही कार्यवाही आयोगाचे आदेश प्राप्त होताच एक महिन्याचे आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २१-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शिवाजी भाऊसाहेब बनकर पाटील, सहयाद्री प्लॉट नं. २२/पी,विनायकनगर, त्रिमुर्ती चौक, जवाहर कॉलनी,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता,महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्या.,छावणी उपविभाग,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्या.,शहर विभाग क्र.१,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. बाळासाहेब म्हस्के,<br>रा.औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>वनसंरक्षक, वन विभाग,औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहा. वनसंरक्षक,औरंगाबाद वन विभाग,औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३८३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २१-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी -मुख्य लेखापाल, वनसंरक्षक, औरंगाबाद - श्री. सी.गो.सोनवणे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - सहायक वनसंरक्षक, वनभवन,उस्मानपूरा,औरंगाबाद- श्री. आर.पी.पाटील | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३१.१०.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०३.११.२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४.१२.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १६.१२.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८.०२.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व चार सहायक माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी अनुक्रमे खुलताबाद,जालना (दक्षिण),सिल्लोड,अजिंठा उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीने दि. ३१.१०.२००९ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे औरंगाबाद शहरातील व ग्रामीण भागातील परवानाधारक लाकूड आरामशीन (मालकीपट्टा) व विनापरवानाधारक आरामशीन यांची नावे व त्यासंदर्भातील विस्तृत स्वरुपाची माहिती मागितली आहे.त्यावर अपिलार्थीस औरंगाबाद जिल्हयाची माहिती अपेक्षित आहे, असे समजून वनक्षेत्रपाल,औरंगाबाद यांच्याकडे दि.०३.११.२००९ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीचा मूळ अर्ज पाठविण्यात आला व त्याची कल्पना अपिलार्थीस देण्यात आली. यास्तव या माहितीसाठीच्या अर्जाकरिता वनक्षेत्रपाल औरंगाबाद विभाग हे 'जन माहिती अधिकारी' ठरत आहेत. अपिलार्थी यांच्या प्रथम अपील अर्जावर सहायक वनसंरक्षक तथा जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली. त्यावेळी अपिलार्थी उपस्थित होते व दि. १४.१२.२००९ रोजी निर्णय दिला व त्या निर्णयामध्ये औरंगाबाद वनविभागातील सर्व वनपरिक्षेत्र अधिकारी यांच्याकडील माहिती अपिलार्थीस देण्याचे ठरले, असे नमूद केले आहे. त्यानुसार वनपरिक्षेत्र अधिकारी, खुलताबाद, जालना (द),सिल्लोड व अजिंठा यांनी अपिलार्थीस माहिती दिलेली आहे.औरंगाबाद-(दि.१९.१२.२००९),खुलताबाद- (दि.१४.०८.२०१०), जालना(द) -(दि.११.०१.२०१०),अजिंठा-(दि.१९.०४.२०११), व कन्नड (दि.१६.०२.२०१०) यांनी माहिती दिली व सिल्लोड यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध असून व्यक्तिशः उपस्थित राहून प्राप्त करुन घ्यावी, असे दि. १६.१२.२००९ रोजी कळविले आहे. तथापि अपिलार्थी उपस्थित झाले नाहीत. त्यामुळे त्यांना माहिती देता आली नाही. ही माहिती अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे पाठवावी लागेल. उर्वरित वनपरिक्षेत्र अधिकारी, जालना (उ), वैजापूर व नागद यांनी माहिती दिलेली नाही. ही माहिती एक महिन्याचे आत देण्यात येईल, याची व्यवस्था जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक, वनभवन,औरंगाबाद यांना पाहावी लागेल. त्याचप्रमाणे यावर जन माहिती अधिकारी यांनी माहिती आतापर्यंत का दिली नाही, याबाबतचा त्यांचा खुलासा जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक, वनभवन, उस्मानपूरा,औरंगाबाद यांना घ्यावा लागेल. तसेच जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, जालना (उ), वैजापूर व नागद यांना या आदेशाची प्रत तामिल करावयाची जबाबदारी जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक यांची राहील.

आयोगासमोर केलेला युक्तिवाद व सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहता आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, जालना (उ), वैजापूर व नागद यांनी वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी व आतापर्यंत माहिती का दिली नाही, याबाबतचा खुलासा जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक, वनभवन,औरंगाबाद यांचेमार्फत आयोगास या कालावधीमध्ये सादर करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २१-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बाळासाहेब म्हस्के, राहुलनगर,रेल्वेस्टेशनजवळ,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्य लेखापाल,वनसंरक्षक कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक, वनभवन,उस्मानपुरा,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. प्रकाश विठ्ठलराव मुंढे,<br>रा.औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>शिक्षण उपसंचालक,<br>विभागीय कार्यालय,औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षण उपसंचालक,<br>विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय,औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३८४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २१-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - सहायक शिक्षण संचालक, विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय,औरंगाबाद - श्री. बी.ए.तुपे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - विभागीय शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद- श्री. लक्ष्मीकांत पांडे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०३.१०.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०६.१०.२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८.११.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २१.१२.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८.०२.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीपैकी त्यांच्या कार्यालयात जी माहिती उपलब्ध होती, ती माहिती जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे झालेल्या अपिलार्थीच्या प्रथम अपिलावरील सुनावणीच्यावेळी दि. २१.१२.२००९ रोजी उपलब्ध करुन देण्यात आली आहे. उर्वरित माहिती अध्यापक विद्यालयाने अपिलार्थीस परस्पर उपलब्ध करुन द्यावी असे ठरल्याचे व ही बाब अपिलार्थीस मान्य असल्याचेही अपिलार्थीच्या प्रथम अपिलावरील निर्णयामध्ये नमूद केलेले आहे.

आयोगापुढील कागदपत्रांवरुन ही बाब आढळून येत आहे. त्यानुसार अपिलार्थीस उर्वरित माहिती दि. १४.०५.२०१० रोजी प्राप्त झालेली आहे व त्याची पोच त्यांनी दिलेली आहे, असे जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात पुढे आयोगास अवगत केले आहे. अपिलार्थी यांना त्यांचे दि. १८.०२.२०१० रोजीचे द्वितीय अपील दाखल केल्यानंतर उर्वरित माहिती प्राप्त झाली आहे, असे कागदपत्रांवरुन दिसून येत आहे.

या सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थीस माहिती मिळाल्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २१-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. प्रकाश विठ्ठलराव मुंढे, एन-१२,जी-८०, विवेकानंदनगर, हडको, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक शिक्षण संचालक, विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अजय दिनकरराव पाटील, : अपीलकर्ता
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन),पोलीस आयुक्त कार्यालय,औरंगाबाद शहर,औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी, :
पोलीस आयुक्त कार्यालय,औरंगाबाद शहर,औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३८५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २१-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन), पोलीस आयुक्त कार्यालय,औरंगाबाद शहर - श्री. के.एस.बहुरे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - पोलीस उपायुक्त (मुख्यालय), पोलीस आयुक्त कार्यालय,औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४.११.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २०.०१.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७.१२.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २४.०२.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली संपूर्ण माहिती दुसऱ्या कक्षाकडे उपलब्ध असल्याने ती त्या प्राधिकरणाकडून प्राप्त करुन घेऊन अपिलार्थीस पुरविण्यात आलेली आहे. तथापि अपिलार्थीच्या जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे सादर केलेल्या दि. ०७.१२.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतल्याचे आयोगास आढळून येत नाही. तरी हे प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त (मुख्यालय), पोलीस आयुक्त कार्यालय,औरंगाबाद यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे. त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारीत करावा.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि.०७.१२.२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश प्राप्त होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २१-०४-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अजय दिनकरराव पाटील,जयेश आर्टस स्टुडिओ,२,वृंदावन कॉम्प्लेक्स, खडकेश्वर,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन), औरंगाबाद शहर,पोलीस आयुक्त कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त (मुख्यालय), पोलीस आयुक्त कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. अविनाश आर. देशपांडे,<br>रा.औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी,<br>शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३८६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २१-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. अविनाश आर. देशपांडे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४.११.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ११.११.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २३.११.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २१.१२.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २६.०२.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वत: अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटते. त्यामुळे सदर प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २१-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अविनाश आर. देशपांडे,प्लॉट नं.१,इंदुगंगा आर्केड, सिडको कम्युनिटी सेंटरच्या बाजुला, सिडको, एन-२,औरंगाबाद -०३

२. जन माहिती अधिकारी, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी,शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अरुण रंगनाथराव धोकटे, : अपीलकर्ता
रा.गंगापूर,जि.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.वि.),
जिल्हा परिषद, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३८७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २१-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. अरुण रंगनाथराव धोकटे | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी -कक्ष अधिकारी (सा.प्र.वि.),जिल्हा परिषद, औरंगाबाद - श्री. राजेंद्र काळे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.वि.), जिल्हा परिषद, औरंगाबाद - प्रतिनिधी - श्री. बिऱ्हाडे एस.एस., विस्तार अधिकारी (सांख्यिकी) | : | उपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - श्री. राजेंद्र पुरुषोत्तम जोशी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४.०८.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २३.०९.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०६.०१.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४.०२.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्रयस्थ पक्ष श्री. राजेंद्र पुरुषोत्तम जोशी यांच्या व त्यांच्या कुटुंबियांच्या वैयक्तिक व चलसंपत्तीविषयी माहिती मागितलेली आहे. याबाबत त्रयस्थ पक्षास त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी संधी देण्यात आली व त्रयस्थ पक्षाने ही माहिती त्यांची वैयक्तिक असल्यामुळे त्यांच्या खाजगी बाबीत आगंतुक हस्तक्षेप करणारी असल्यामुळे देण्यात येऊ नसे, असे कळविले आहे. मात्र जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील त्रयस्थ पक्षाशी संबंधित अपिलार्थीस देय असलेली, त्रयस्थ पक्षाच्या नोकरीस लागल्याची माहिती अपिलार्थीस दिलेली आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दिलेल्या निर्णयामध्ये याबाबतचा उल्लेख केला असून त्रयस्थ पक्षाच्या खाजगी बार्बीची माहिती देय होत नाही, याबाबत उहापोह करुन माहिती न देण्याचा निर्णय घेतला आहे. सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात त्रयस्थ पक्षाच्या चल व अचल संपत्तीची माहिती मिळावी अशी आयोगास विनंती केली आहे.तथापि अपिलार्थी याबाबत व्यापक जनहित कसे साध्य होणार आहे याकरिता संयुक्तिक समर्थन देऊ शकले नाहीत.

आयोगापुढे दोनही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगापुढील कागदपत्रांवरुन आयोग या निष्कर्षाप्रत येत आहे की,त्रयस्थ पक्षाच्या नावे असलेल्या चल व अचल संपत्तीची माहिती उघड करण्यामुळे व्यापक जनहित (Larger Public interest) साध्य होईल, असे समर्थनीय व ठोस कारण दिसून येत नाही. अपिलार्थी यांनी त्रयस्थ पक्षाच्या नावे असलेल्या चल व अचल संपत्तीची माहिती मागितलेली आहे ती माहिती उघड करण्यापूर्वी ही बाब अधिनियमातील कलम ८(१)(ङ) व कलम ८(१)( ञ) अन्वये व्यापक जनहिताच्या कसोटीस उतरणे आवश्यक आहे. त्यामुळे ही माहिती, माहिती अधिकार अधिनियमानुसार देय होत नाही. अतः अधिनियमातील कलम ८(१)( ङ) व कलम ८(१)(ञ) विचारात घेता, अपिलार्थी यांनी मागितलेल्या त्रयस्थ पक्षाच्या नावे असलेल्या चल व अचल संपत्तीची माहिती उघड करणे, ही बाब त्रयस्थ पक्षाच्या खाजगी बाबीत आगंतुक हस्तक्षेप होत असून संबंधितांच्या विश्वासाश्रित संबंधावर बाधा येण्याबरोबरच व्यापक जनहिताच्या कसोटीस उतरत नाही. त्यामुळे ही माहिती अधिनियमातील तरतुदीनुसार देय होत नाही. यास्तव अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २१-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

-------------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अरुण रंगनाथराव धोकटे, गोदावरी कॉलनी, गंगापूर,जि.औरंगाबाद-४३१ १०९.

२. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, सा.प्र.वि.जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.वि.) जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. रविंद्र बळीराम मोरे,<br>रा.साळेगाव, ता.कळमनुरी, जि.हिंगोली | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार,<br>तहसील कार्यालय कळमनुरी, जि. हिंगोली | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार,कळमनुरी, जि.हिंगोली | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/८०१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २१-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार, तहसील कार्यालय,कळमनुरी, जि.हिंगोली - प्रतिनिधी - श्री. आर.एल.पर्रे, अ.का. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, कळमनुरी, जि.हिंगोली | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२.११.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २१.१२.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३१.१२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २२.०३.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या उपस्थित प्रतिनिधीने या प्रकरणी त्यांना काहीही माहिती नाही, असे आयोगास सांगितले. प्रकरणात दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत आहे. त्यामुळे सदर प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**

**दिनांक २१-०४-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रविंद्र बळीराम मोरे,रा.साळेगाव,पो.सांडस, ता.कळमनुरी, जि.हिंगोली

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय,कळमनुरी, जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, कळमनुरी, जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्रीमती नंदाबाई भागाजी मोकळे,<br>रा.औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>अवसायक,<br>महानगरपालिका कर्मचारी को-ऑप.क्रेडिट सोसायटी<br>मर्या.,औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>तालुका उपनिबंधक,सहकारी संस्था,औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२२७३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २१-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी -शाखाधिकारी, औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सह.बँक, शाखा शहागंज - श्री. एस.ए.गजहंस | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - उपनिबंधक सहकारी संस्था,ता.औरंगाबाद-श्री. जी.जी.मावळे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १५.०५.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २७.०५.२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६.०७.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २८.०७.२००९ |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०८.०९.२००९

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास प्रकरणाची पार्श्वभूमी सांगताना अवगत केले की, सदरची सहकारी पतसंस्था महानगरपालिका चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांची असून या पतसंस्थेची महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० अन्वये नोंद करण्यात आली आहे. अपिलार्थी यांचे वडील या पतसंस्थेचे सभासद होते व त्यांचे निधन झाल्यानंतर अपिलार्थीस नियमानुसार महानगरपालिकेमध्ये अनुकंपा तत्त्वावर नोकरी देण्यात आली आहे. त्यामुळे त्यांच्या वडिलांचे थकित कर्ज चुकते करण्याची जबाबदारी अपिलार्थीची होत आहे.अपिलार्थी यांनी त्यांनी कर्ज मागणी केलेल्या अर्जाची प्रत व त्या कागदपत्रांची एकूण चार मुद्यांद्वारे मागणी केलेली आहे. ती अपिलार्थीस द्यावी असा निर्णय सुध्दा जन अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था,ता.औरंगाबाद यांनी दि. २८.०७.२००९ रोजी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय देताना घेतलेला आहे. तथापि त्यांना अद्यापपावेतो माहिती मिळालेली नाही. सदरची पतसंस्था अवसायनात असून त्यावर अवसायकाची नेमणूक झालेली आहे. अवसायक यांनी सुनावणीच्यावेळी उपलब्ध कागदपत्रांतून सदरची माहिती शोधण्याचा प्रयत्न करण्यात आला तथापि ही माहिती आढळून आली नाही, असे आयोगास सांगितले.

या प्रकरणी आयोगाच्या असेही नजरेस आले की, या पतसंस्थेची सर्व कागदपत्रे महानगरपालिका कार्यालयामध्ये सुरक्षित जतन करुन ठेवण्यात आलेली आहेत. यास्तव वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थी व त्यांचे वडील यांची त्यांनी संबंधित सहकारी संस्थेकडून घेतलेल्या कर्जाबाबत तपशील दर्शविणारी सर्व कागदपत्रे महानगरपालिकेतील संबंधित सहायक आयुक्त क्र.२ (आस्था) यांच्या कार्यालयामध्ये शोधून अपिलार्थीस देण्याचा प्रयत्न करावा लागेल.सहायक आयुक्त क्र.२ (आस्था), महानगरपालिका,औरंगाबाद यांना यासाठी अवसायक तथा शाखाधिकारी, औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सह.बँक, शाखा शहागंज यांना सहकार्य करावे लागेल.

आयोगासमोर केलेला युक्तिवाद व सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहता आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

अवसायक तथा शाखाधिकारी, औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सह.बँक, शाखा शहागंज यांनी सहायक आयुक्त क्र.२ (आस्था), महानगरपालिका,औरंगाबाद यांच्या सहकार्याने अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती शोधून छायाप्रती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवाव्यात.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २१-०४-२०११ खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्रीमती नंदाबाई भागाजी मोकळे,द्वारा- सुरेश बोर्डे,सिध्दार्थनगर, एन-१२, हडको,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा शाखाधिकारी, औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सह.बँक, शाखा शहागंज, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था,ता.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. वामन चेंडाजी धिवर, : अपीलकर्ता
रा.गंगापूर, जि.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
चेअरमन/मॅनेजर,गंगापूर तालुका सहकारी खरेदी विक्री संस्था मर्या., ता.गंगापूर, जि.औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००७/रामाआ/अपील/सिआर/२९५५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २१-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. वामन चेंडाजी धिवर | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी -व्यवस्थापक,गंगापूर तालुका सहकारी खरेदी-विक्री संस्था,मर्या.,गंगापूर,जि.औरंगाबाद - श्री. भा.का.सोनवणे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,औरंगाबाद - श्री.देविदास मा. पालोदकर | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २६.१०.२००६ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २७.११.२००६ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०७.१२.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ०२.०१.२००७ |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ३०.०३.२००७

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली संपूर्ण माहिती त्यांना देण्यात आली आहे. अपिलार्थी यांनी ही बाब सुनावणीच्यावेळी मान्य केली. या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे विचाराधीन अपील आयोगाच्या स्तरावर बंद करण्यात यावे, या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २१-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. वामन चेंडाजी धिवर, रा.प्रगती कॉलनी,गंगापूर, जिल्हा औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक, गंगापूर तालुका सहकारी खरेदी-विक्री संस्था मर्या.,गंगापूर,जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. मंगेश बाबुराव कुलकर्णी,<br>रा.गंगापूर, जि.औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>तालुका कृषि उत्पन्न बाजार समिती,गंगापूर, जि.औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००७/रामाआ/अपील/सिआर/२९५६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २१-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, गंगापूर,जि.औरंगाबाद - श्री. ए.बी.जाधव | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था,औरंगाबाद -श्री. दे.मा. पालोदकर | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १८.०१.२००७ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०३.०२.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २०.०४.२००७ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०.०४.२००७ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीच्या दि. १७.०१.२००७ रोजीच्या माहितीसाठीच्या अर्जान्वये मागितलेली माहिती दि. ०३.०२.२००७ रोजीच्या पत्राद्वारे दिली असून त्याबाबतची पोच दि. ०५.०२.२००७ रोजीच्या स्थळप्रतीवर आहे. अपिलार्थी यांनी जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद यांच्याकडे प्रथम अपील सादर केले, त्यावर सुनावणी घेऊन दि. २०.०४.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे अपील अमान्य करुन त्याची कारणमिमांसा त्यांच्या निर्णयामध्ये नमूद केलेली आहे. अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे सादर केलेल्या दि. २३.०४.२००७ रोजीच्या द्वितीय अपिलामध्ये जे मुद्दे नमूद केले आहेत. ते मुद्दे 'माहिती' या व्याख्येत बसत नाही, असे आढळून येत आहे. त्याचप्रमाणे आवश्यक असलेल्या माहितीच्या स्वरुपात माहिती मागण्याऐवजी कार्यवाहीची शिफारस केलेली आहे.

या सर्व बाबी विचारात घेता अपिलार्थीचे विचाराधीन अपील आयोगाच्या स्तरावर बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत येऊन आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २१-०४-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मंगेश बाबुराव कुलकर्णी, 'रेणुका',ब्राम्हण कॉलनी, गंगापूर, ता.गंगापूर जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, गंगापूर,जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शेख पाशु शेख यासीन, : अपीलकर्ता
रा. टिळक नगर, मच्छी मार्केटच्या बाजूला, कन्नड,
तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्याधिकारी, नगर परिषद, कन्नड, जिल्हा औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्याधिकारी, नगर परिषद, कन्नड, जिल्हा औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३८८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २६-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी,<br>कार्यालय मुख्याधिकारी नगर परिषद, कन्नड, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, कन्नड, जिल्हा औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २०-०६-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५-०८-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. २४-०९-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४-०१-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. प्रकरणात आयोगास वस्तुस्थिती अवगत होऊ शकली नाही.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक २०-०६-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागितलेली संपूर्ण माहिती त्यांना मिळालेली नाही. त्याचप्रमाणे अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, कन्नड यांनी दिनांक २४-०९-२००९ रोजी सुनावणी घेतली आहे. त्यावेळी अपिलार्थी तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित होते असे आढळून येत आहे. प्रथम अपिलाचा निर्णय मुख्याधिकारी, नगर परिषद, कन्नड यांनी राखून ठेवला आहे असे आढळून येत आहे. याकरिता सदरचे प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, कन्नड यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे. त्यांना अपिलार्थीच्या प्रथम अपिलाच्या पूर्वीच्या सुनावणीच्या संदर्भात प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारीत करावा लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, कन्नड, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दिनांक २५-०८-२००९ रोजीच्या प्रथम अपिलाच्या पूर्वीच्या सुनावणीच्या संदर्भात प्रथम अपिलावर पुन्हा आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत सुनावणी घेऊन निर्णय पारीत करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २६-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख पाशु शेख यासीन, रा. टिळक नगर, मच्छी मार्केटच्या बाजूला, कन्नड, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी, कार्यालय मुख्याधिकारी नगर परिषद, कन्नड, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, कन्नड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अरुण रंगनाथराव धोकटे, : अपीलकर्ता
गोदावरी कॉलनी, गंगापूर, तालुका गंगापूर,
जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३८९ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २६-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद -<br>प्रतिनिधी - श्री. पवार बी. बी., अधीक्षक वर्ग-२ | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद | : अनुपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - मधुकर काशिनाथ वालतुरे | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०४-०८-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १४-०८-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २३-०९-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०६-०१-२००९ |

(वर्ष २०१० आहे)

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०४-०२-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक ०४-०८-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये त्रयस्थ पक्ष व त्यांच्या कुटुंबियांची नावे असलेल्या चल व अचल संपत्तीची माहिती मागितली आहे. सदरची माहिती जन माहिती अधिकारी यांनी नाकारली आहे त्याचप्रमाणे जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी सुध्दा माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८ (ज) च्या तरतुदीनुसार अपिलार्थीचे प्रथम अपील खारीज केले आहे.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्रयस्थाच्या संदर्भातील ज्या माहितीची मागणी केली आहे ती माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८ (१) (ज) च्या तरतुदीन्वये व्यापक जनहिताच्या कसोटीवर उतरत नसल्यामुळे देय होत नाही त्यामुळे सदरचे अपील फेटाळण्यायोग्य आहे. तथापि अपिलार्थीने मागितलेल्या माहितीमध्ये फक्त त्रयस्थासंबंधीच्या नोकरीस लागलेला दिनांक मात्र जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस कळवावा लागेल. तो आयोगाचे आदेश प्राप्त होताच पंधरा दिवसाच्या आत कळविण्यात यावा.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २६-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अरुण रंगनाथराव धोकटे, गोदावरी कॉलनी, गंगापूर, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद

यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. गजानन बी.पाटील,<br>रा.औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>नगर भूमापन अधिकारी, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक,भूमी अभिलेख, औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३९० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २६-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. गजानन बी.पाटील | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नगर भूमापन अधिकारी,औरंगाबाद - श्री. ब.ग.बांगर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख, औरंगाबाद- श्री. के.आर.तवरेज | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २८.०५.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७.०७.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ३०.०९.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०५.०२.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, विचाराधीन प्रकरणी अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे त्यांचे द्वितीय अपील सुमारे ३६ दिवस विलंबाने सादर केले आहे. सदरच्या विलंबाचे समर्थनीय कारण ते सुनावणीच्या वेळी देऊ शकले नाहीत. तरी एक विशेष बाब म्हणून हे द्वितीय अपील दाखल करुन सुनावणी पुढे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व आयोगापुढील कागदपत्रांवरुन आयोगास असे आढळून येत आहे की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती त्यांना आतापर्यंत देता आली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन माहिती द्यावी असा मोघम निर्णय दि. ३०.०९.२००९ रोजी घेतलेला आहे. त्याऐवजी अपिलार्थीने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात त्यांनी मुद्देनिहाय उहापोह करुन अधिनियमातील कलम ११ मधील तरतुदी विचारात घेऊन देय असलेली माहिती देण्यासंबंधी जन माहिती अधिकारी यांना सूचना केली असती तर उचित राहिले असते व त्यानंतर जन माहिती अधिकारी यांना माहिती देणे सोयीचे झाले असते. यास्तव प्रकरण जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख, औरंगाबाद यांना अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर अधिनियमातील कलम ११ मधील तरतुदी विचारात घेऊन पुनश्च सुनावणी घेऊन अपिलार्थीच्या मूळ अर्जासंदर्भात मुद्देनिहाय विचार करुन दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून अधिनियमातील तरतुदीनुसार कारणमिमांसेसह निर्णय घ्यावा लागेल व त्याप्रमाणे निर्णय पारीत करावा लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख, औरंगाबाद यांनी वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर अधिनियमातील कलम ११ मधील तरतुदी विचारात घेऊन पुनश्च सुनावणी घेऊन आपला स्वयंस्पष्ट निर्णय हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत पारीत करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २६-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गजानन बी.पाटील,द्वारा श्री. किशोर अग्रवाल, २, तळमजला, गोमटेश मार्केट, अभ्युदय बँकेसमोर, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. रविंद्र भागाजी खरात, : अपीलकर्ता
मु. पो. करमाड, तालुका जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसीलदार, तहसील कार्यालय, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३९१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. | २६-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, औरंगाबाद - श्री. वामन कदम | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. | १६-११-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. | १६-१२-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. | २७-०१-२०१० |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०८-०२-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या आजोबाच्या नावे असलेल्या जमिनीच्या तुकड्यावरील त्यांच्या हिश्याबाबत उल्लेख करुन त्यांचे नांव समाविष्ट करावे असे मूळ अर्जात नमूद केले आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी सदरचा प्रथम अपील अर्ज संबंधित मंडळ अधिकारी तथा जन माहिती अधिकारी यांच्याकडे वर्ग केला व त्यांनी पुढे तो तलाठी यांच्याकडे पाठविला. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन अपील अमान्य केले. आदेशात नमूद केले आहे की, माहिती अधिकारी तथा तलाठी व नायब तहसीलदार (महसूल) यांच्याशी संपर्क साधून माहिती हस्तगत करुन घ्यावी. जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास पुढे असे अवगत केले की, अपिलार्थीस यासंदर्भातील प्रकरणात व इतर अर्जाकरिता वेळोवेळी कळविण्यात आलेले आहे.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रे पाहता आयोगाच्या असे निदर्शनास येत आहे की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक १६-११-२००९ च्या अर्जान्वये मागितलेली माहिती ही माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या "माहिती" या शब्दाच्या संज्ञेत बसत नाही त्यामुळे देय होऊ शकत नाही. अपिलार्थी यांना प्रशासकीय कार्यवाहीसाठी स्वतंत्र पत्रव्यवहार करावा लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २६-०४-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रविंद्र भागाजी खरात, मु. पो. करमाड, तालुका जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. बाळासाहेब म्हस्के,<br>राहुलनगर, रेल्वेस्टेशनजवळ, औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३९२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २६-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद - श्री. देशमुख व्ही. जी. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद - श्री. बी. डी. तोडकरी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०-०९-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०५-१०-२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४-११-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १२-०१-२०१० |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. १८-०२-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक ३०-०९-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत शासकीय विश्रामगृह देखभाल दुरुस्ती संदर्भात सर्व उप अभियंता यांच्या अधिपत्या खालील विश्रामगृहांची विस्तृत अशी माहिती मागितली आहे. सदरची माहिती अपिलार्थीस परस्पर देण्याकरिता अपिलार्थीचा मूळ अर्ज दिनांक ०५-१०-२००९ रोजी सर्व उप अभियंता यांना पाठविण्यात आला आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दिनांक ११-०१-२०१० रोजी सुनावणी घेऊन निर्णय दिला आहे. या निर्णयात नमूद केले आहे की, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, सिल्लोड, फर्दापूर व फुलंब्री यांची माहिती अर्जदारास प्राप्त झाली असून उपविभाग, उत्तर दक्षिण व पैठण यांनी अर्जदारास आठ दिवसाच्या आत माहिती देण्याची व्यवस्था करावी. अपिलार्थीस ही माहिती देण्यात आली आहे असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले. आयोगापुढे केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन अपिलार्थीस माहिती मिळाल्याचे आढळून येत आहे.

अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगास लिहिलेले त्यांचे दिनांक २८-०३-२०११ रोजीचे पत्र आयोगासमोर आहे. या पत्रामध्ये अपिलार्थी यांनी नमूद केले आहे की, त्यांच्या विचाराधीन व्दितीय अपिलार्थीसंदर्भातील संपूर्ण माहिती त्यांना मिळाली असून त्यांचे व्दितीय अपील रद्द करण्यात यावे. या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २६-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बाळासाहेब म्हस्के, राहुलनगर, रेल्वेस्टेशनजवळ, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.    निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. सुदामराव रामराव भोसले, | : | अपीलकर्ता |
| मु. पो. जडगांव, तालुका जिल्हा औरंगाबाद | | |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा | : | उत्तरवादी |
| गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती कार्यालय, औरंगाबाद | | |
| जन अपिलीय अधिकारी तथा | : | |
| शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद | | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३९३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २६-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक, प्राथमिक शाळा, जडगांव, तालुका जिल्हा औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद<br>- प्रतिनिधी - श्री. पवार बी. बी., अधीक्षक वर्ग-२ | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०४-११-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ०७-१२-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९-०३-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी तेरा मुद्दयांवर प्राथमिक शाळा, जडगांव, तालुका जिल्हा औरंगाबाद या शाळेतील विविध योजनांच्या बाबींच्या खर्चासंबंधी तपशीलनिहाय जानेवारी २००५ ते डिसेंबर २००९ पर्यंतची विस्तृत माहिती मागितली आहे. अपिलार्थी यांनी मागितलेली संपूर्ण माहिती उपलब्ध असल्याचे जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, प्राथमिक शाळा, जडगांव, तालुका जिल्हा औरंगाबाद यांनी दिनांक १८-०२-२०१० व दिनांक २६-०४-२०१० रोजी अपिलार्थीस कळविले आहे. अपिलार्थी हे व्यक्तिशः माहिती प्राप्त करुन घेणार होते तथापि अद्यापपावेतो त्यांनी माहिती प्राप्त करुन घेतलेली नाही.

आज रोजी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, प्राथमिक शाळा, जडगांव, तालुका जिल्हा औरंगाबाद यांच्याकडे माहिती उपलब्ध आहे ती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहून प्राप्त करुन घेण्यासाठी अपिलार्थीस पुन्हा एकदा संधी देण्यात यावी. ही बाब जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्या कार्यालयामार्फत एक तारीख निश्चित करुन नोंदणीकृत टपालाने अपिलार्थीस कळविण्यात यावी व अपिलार्थीने त्या दिवशी माहिती व्यक्तिशः प्राप्त करुन घ्यावी.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही आयोगाचे आदेश प्राप्त होताच पंधरा दिवसाच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २६-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सुदामराव रामराव भोसले, मु. पो. जडगांव, तालुका जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, प्राथमिक शाळा, जडगांव, तालुका जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.		निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. मनोहर विश्वनाथ पारखे, : अपीलकर्ता
रा. जोगेश्वर, पो. वाळूज, तालुका गंगापूर,
जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्याध्यापक, किशनलाल तापडिया मेमोरियल स्कूल, ए. एस. क्लब शेजारी, नगर रोड, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद

१ अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३९४

२ सुनावणीची तारीख — दि. २६-०४-२०११

३ आज रोजीची उपस्थिती

३.१ अपिलार्थी - श्री. मनोहर विश्वनाथ पारखे : उपस्थित

३.२ जन माहिती अधिकारी तथा : अनुपस्थित
मुख्याध्यापक, किशनलाल तापडिया मेमोरियल स्कूल, ए. एस. क्लब शेजारी, नगर रोड, औरंगाबाद

३.३ जन अपिलीय अधिकारी तथा : उपस्थित
शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद
- प्रतिनिधी - श्री. बाळासाहेब पवार, अधीक्षक वर्ग-२

४ जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख — दि. २३-११-२००९

५ जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख — --

| | | | |
|---|---|---|---|
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | ३१-१२-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | ०४-०३-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक २३-११-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये किशनलाल तापडिया मेमोरियल स्कूल, औरंगाबाद या शाळेची तीन मुद्दयांवर माहिती मागितली आहे. या शाळेस शासनातर्फे कोणतेही अनुदान देण्यात येत नाही त्यामुळे ही शाळा कायम विना अनुदानित शाळा असल्यामुळे माहिती अधिकार अधिनियम २००५ हा कायदा या शाळेस लागू होत नाही. सुनावणीच्या वेळी अपिलार्थीस ही बाब मान्य झाली आहे. तथापि अपिलार्थीने तीन मुद्दयांवर माहिती मागितली आहे त्यापैकी जी माहिती संबंधित शाळेने जिल्हा परिषदेशी पत्रव्यवहार केल्यामुळे निर्माण झाली आहे त्याच्या प्रती जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्याकडे असतील त्या अपिलार्थीस देय होत आहेत व विनामूल्य द्याव्या लागतील असे आयोगाचे मत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे व अपिलार्थीस देय असलेली माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २६-०४-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. मनोहर विश्वनाथ पारखे, रा. जोगेश्वर, पो. वाळूज, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, किशनलाल तापडिया मेमोरियल स्कूल, ए. एस. क्लब शेजारी, नगर रोड, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. एस. एन. कादरी,<br>रऊफ कॉलनी, नेहरु भवन जवळ, औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३९५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २६-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. एस. एन. कादरी | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद - श्री. देशमुख व्ही. जी. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद - श्री. बी. डी. तोडकरी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०३-१०-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४-११-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ११-०३-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक ०३-१०-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागितलेली माहिती त्यांना दिनांक ०६-११-२००९ रोजी देण्यात आलेली आहे. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या प्रथम अपिलावर त्यांनी दिनांक ०६-०१-२०१० रोजी सुनावणी घेतली व निर्णय दिला. या निर्णयामध्ये असे नमूद केले आहे की, मुद्दा क्रमांक १ व २ बाबत अपिलार्थीचे काही आक्षेप नसून मुद्दा क्रमांक ३, ४ व ५ बाबतची माहिती अपिलार्थीस अपूर्ण देण्यात आली आहे. आणि पंधरा दिवसात ती अपिलार्थीस देण्यात यावी. अपिलार्थी यांना सदरची माहिती दिनांक १८-०१-२०१० रोजी देण्यात आली असून अपिलार्थी यांनी ती स्विकारली आहे. अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी या बाबी आयोगापुढे मान्य केल्यात. तथापि त्यांना काही माहिती अपूर्ण मिळाली आहे ती देण्यात यावी अशी भूमिका मांडली. याकरिता अपिलार्थी यांना पंधरा दिवसाच्या आत मूळ अर्जाच्या संदर्भात नेमकी कोणती माहिती अपूर्ण मिळाली हे जन माहिती अधिकारी यांना कळवावे लागेल व पुढील पंधरा दिवसात जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस मूळ अर्जासंदर्भाच्या अनुषंगाने उर्वरीत माहितीच्या छायांकीत प्रती अपिलार्थीस पाठवाव्या लागतील. ही बाब दोन्ही बाजूंनी सुनावणीच्या वेळी मान्य केली.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहितीपैकी अपूर्ण राहिलेली माहिती विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २६-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. एस. एन. कादरी, रऊफ कॉलनी, नेहरु भवन जवळ, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद

यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शेख जमीर शेख मासुम, : अपीलकर्ता
पटेल मंडली, खुलताबाद, जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, खुलताबाद, तालुका खुलताबाद, जिल्हा औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, औरंगाबाद

१ अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३९६

२ सुनावणीची तारीख दि. २६-०४-२०११

३ आज रोजीची उपस्थिती

३.१ अपिलार्थी - श्री. शेख जमीर शेख मासुम : उपस्थित

३.२ जन माहिती अधिकारी तथा : उपस्थित
उप विभागीय अधिकारी, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, खुलताबाद, तालुका खुलताबाद, जिल्हा औरंगाबाद
- श्री. एन. एम. काझी

३.३ जन अपिलीय अधिकारी तथा : उपस्थित
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, औरंगाबाद - श्री. प्रशांत सोनवणे

४ जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख दि. ०६-११-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २१-१२-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. | १०-०२-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | ०६-०३-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक ०६-११-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये मार्च २००८ ते अर्जाच्या दिनांकापर्यंत सार्वजनिक बांधकाम उपविभाग, खुलताबाद यांच्या कार्यक्षेत्रातील विविध रस्त्यांवर व इमारतीवर करण्यात आलेल्या विविध कामांचा तपशील व त्याचप्रमाणे कनिष्ठ अभियंते व शाखा अभियंते यांचा या कार्यालयातील सेवाकाल व त्यांच्याकडे असलेल्या कामांची व इमारतीच्या व रस्त्यांची विस्तृत व व्यापक स्वरुपाची माहिती मागितली आहे. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १०-०२-२०१० रोजी सुनावणी घेऊन निर्णय दिला आहे की, अपिलार्थीस माहिती देय आहे ती देण्यात यावी. जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, अपिलार्थी व्यक्तिशः माहिती घेणार होते म्हणून अपिलार्थी यांना दिनांक ०८-०२-२०१० रोजीच्या पत्राने तसे कळविले आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादात आयोगास सांगितले की, त्यांना हे पत्र हे पत्र प्राप्त झाले नाही त्यामुळे ते माहिती हस्तगत करु शकले नाहीत.

या सर्व बाबींचा विचार करता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस एक दिवस निश्चित करुन माहिती व्यक्तिशः हस्तगत करण्याचे नोंदणीकृत टपालाने कळवावे लागेल व त्या दिवशी अपिलार्थी उपस्थित झ ाल्यास त्यांना विनामूल्य माहितीच्या प्रती द्याव्या लागतील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस एक दिवस निश्चित करुन माहिती व्यक्तिशः हस्तगत करण्याचे नोंदणीकृत टपालाने कळवावे व त्या दिवशी अपिलार्थी उपस्थित झाल्यास त्यांना विनामूल्य माहितीच्या प्रती द्याव्यात.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २६-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख जमीर शेख मासुम, पटेल मंडली, खुलताबाद, तालुका खुलताबाद, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, खुलताबाद, तालुका खुलताबाद, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. लक्ष्मण रामभाऊ घोडके, : अपीलकर्ता
रा. सिध्दपूरवाडी, पो. गंगापूर, तालुका गंगापूर,
जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग (वि. प्र.),
गंगापूर, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग,
औरंगाबाद

१ अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३९७

२ सुनावणीची तारीख दि. २६-०४-२०११

३ आज रोजीची उपस्थिती

३.१ अपिलार्थी - श्री. लक्ष्मण रामभाऊ घोडके : उपस्थित

३.२ जन माहिती अधिकारी तथा : उपस्थित
उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग (वि. प्र.),
गंगापूर, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद
- श्री. ताराचंद ओकांर राठोड

३.३ जन अपिलीय अधिकारी तथा : उपस्थित
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग,
औरंगाबाद - श्री. प्रशांत सोनवणे

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. | ०४-११-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | १५-१२-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. | ०३-०२-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | १०-०३-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक ०४-११-२००९ रोजीच्या मूळ अर्जान्वये सन २००७ या कालावधीतील दोन रस्त्यावरील कामाबाबतची विस्तृत माहिती मागितली आहे. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २८-०१-२०१० रोजी सुनावणी घेऊन त्याच दिवशी निर्णय घेण्यात आला आहे की, सदरील माहिती अपिलार्थीस देय होत असून ती पंधरा दिवसाच्या आत अपिलार्थीस देण्यात यावी.

जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, संबंधित माहितीचे अभिलेखे संबंधित कनिष्ठ अभियंता यांच्याकडे आहेत व त्यांना तीन वेळेस दिनांक १४-१२-२००९, दिनांक १५-०२-२०१० व दिनांक १३-०३-२०१० रोजी अभिलेखे उपलब्ध करुन देण्याकरिता कळविण्यात आले आहे तथापि त्यांना माहिती त्यांच्याकडून प्राप्त झाली नाही. याची गंभीर दखल आयोग घेत आहे. जन माहिती अधिकारी यांना ही माहिती अपिलार्थीस पुरवावी लागेल.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्या वेळी त्यांच्या युक्तिवादात आयोगास सांगितले की, सदरचे रस्त्याचे दुष्काळामध्ये अपूर्ण मातीकाम झाले असून सन २००७ मध्ये रस्त्याच्या बाजूला खडी व मुरुम टाकण्यात आले आहे व सन २००७ मधील मुरुम व खडीबाबतची ते माहिती ते मागवित आहे.

ही माहिती अपिलार्थीस देय होत आहे व ती अपिलार्थीस द्यावी लागेल असे आयोगाचे मत आहे. जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता यांनी ज्या कनिष्ठ अभियंत्याकडे अभिलेखे उपलब्ध आहेत त्यास कळवूनही त्यांनी अभिलेखे उपलब्ध करुन दिलेले नाहीत त्यामुळे संबंधित कनिष्ठ अभियंता श्री. अशोक बी. राऊत या प्रकरणात जन माहिती अधिकारी होत आहेत व त्यामुळे या प्रकरणात संबंधित जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न दिल्यामुळे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) चा भंग झाला असल्यामुळे ते शास्तीस पात्र ठरत आहे. याकरिता कलम २० (१) च्या परंतुकानुसार संबंधित जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता श्री. अशोक बी. राऊत यांना रुपये २५००० शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा हीच कारणे दाखवा नोटीस समजून त्यांना आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, औरंगाबाद यांच्यामार्फत आयोगास सादर करावा लागेल. या आदेशाची प्रत संबंधितांना तामील करावयाची जबाबदारी कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, औरंगाबाद यांची राहील.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

१. जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेली माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

२. संबंधित जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता श्री. अशोक बी. राऊत यांना रुपये २५००० /- शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा हीच कारणे दाखवा नोटीस समजून त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, औरंगाबाद यांच्यामार्फत आयोगास सादर करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २६-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. लक्ष्मण रामभाऊ घोडके, रा. सिध्दपूरवाडी, पो. गंगापूर, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग (वि. प्र.), गंगापूर, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. श्री. अशोक बी. राऊत, कनिष्ठ अभियंता, मार्फत कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्रीमती प. गं. कोदरकर, : अपीलकर्ता
व्दारा श्री. अकोलकर,
३३ (अ), "रेणुका", छत्रपती नगर, गारखेडा परिसर, औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
जिल्हाधिकारी कार्यालय (स्वा. सै. कक्ष), बीड
जन अपिलीय अधिकारी, :
जिल्हाधिकारी कार्यालय (स्वा. सै. कक्ष), बीड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३९८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २६-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार (सर्वसाधारण), जिल्हाधिकारी कार्यालय, बीड | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड - प्रतिनिधी - श्री. एस. डी. कुलकर्णी, अ. का. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०१-०९-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ३०-१०-२००९ |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २५-०२-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे स्वातंत्र्य सैनिकांच्या अवलंबिताना नोकरी देण्याबाबत माहिती मागितली आहे असे आढळून येत आहे. तथापि अपिलार्थीस आतापर्यंत माहिती देण्यात आली नाही असे आढळून येत आहे.

प्रकरणात दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटते. यास्तव सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक राहील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>अंतरिम आदेश</u>**

या व्दितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २६-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्रीमती प. गं. कोदरकर, व्दारा श्री. अकोलकर, ३३ (अ), "रेणुका", छत्रपती नगर, गारखेडा परिसर, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार (सर्वसाधारण), जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शेख लईक अहेमद शे.शफीयोद्दीन, : अपीलकर्ता
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
अन्नधान्य वितरण अधिकारी, जिल्हाधिकारी
कार्यालय,औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/३९९ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २६-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. शेख लईक अहेमद शे.शफीयोद्दीन | : उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०३.११.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १०.०२.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०९.१२.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १२.०१.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०२.०३.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाहीत. याची गंभीर दखल आयोग घेत आहे.

अपिलार्थी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, त्यांनी औरंगाबाद शहरातील स्वस्त धान्य दुकानांसंदर्भातील स्वस्त धान्य दुकानाचा परवाना दिल्यापासून माहिती देण्याच्या दिनांकापर्यंत अशी माहिती तीन मुद्यांद्वारे मागितलेली आहे. अपिलार्थी यांच्या युक्तिवादावरुन, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. १०.०२.२०१० अन्वये पाठविलेल्या माहितीमध्ये ज्या माहितीचा समावेश नाही, ती खालीलप्रमाणे अभिप्रेत आहे, असे आढळून येत आहे.

१) औरंगाबाद शहरामध्ये सर्व स्वस्त धान्य दुकानांच्या परवान्यांच्या पहिल्या (ज्या पृष्ठावर परवानाधारकाचे नाव व परवाना मंजूर झाल्याची दिनांक नमूद असेल) पृष्ठाच्या छायाप्रती.

ही माहिती अधिनियमातील तरतुदीनुसार अपिलार्थीस देय होत आहे. ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देताना पुरविली नाही, असे आयोगाच्या निदर्शनास आले आहे. प्रकरणात माहिती पुरविणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना समज द्यावी लागेल. त्याचप्रमाणे उपरोक्त देय असलेली माहिती अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे पाठवावी लागेल. या बाबीकडे अपर जिल्हाधिकारी यांना व्यक्तिशः पहावे लागेल.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी वरील निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे माहिती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी,औरंगाबाद यांनी यामध्ये व्यक्तिशः लक्ष घालावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २६-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख लईक अहेमद शेख शफियोद्दीन, गल्ली नं.४,आसेफिया कॉलनी, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा अन्नधान्य वितरण अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. आर.जी.बाकलीवाल, : अपीलकर्ता
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
क्षेत्र व्यवस्थापक,
महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ,
प्रादेशिक कार्यालय,औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास
महामंडळ,औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४०० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २६-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी -क्षेत्र व्यवस्थापक,महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ,प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद - श्री. जी.एल. गिरी | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ,औरंगाबाद - श्री. आन्नासाहेब शिंदे | : | उपस्थित |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. | १२.१०.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | १७.११.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. | ३१.१२.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | ०२.०३.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्याच्याच भूखंडाबद्दल माहिती अर्जान्वये माहिती मागितलेली होती. ती माहिती त्यांना दि. १४.१२.२००९ रोजी देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे त्यासंदर्भातील अभिलेखे अपिलार्थी यांना त्यांच्या कार्यालयामध्ये दाखविण्यात आले. अपिलार्थी आज अनुपस्थित आहेत. तथापि त्यांचे दि. १९.०४.२०११ रोजीचे आयोगास उद्देशून लिहिलेले पत्र आयोगासमोर आहे. त्यामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, त्यांना माहिती प्राप्त झाली आहे व त्यामुळे ते विचाराधीन अपील मागे घेत आहेत.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २६-०४-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. आर. जी. बाकलीवाल, ३,पन्नालाल नगर, नालंदा शाळेजवळ,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा क्षेत्र व्यवस्थापक,महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, प्रादेशिक कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शंकरराव यशवंतराव शेजवळ, : अपीलकर्ता
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त, औरंगाबाद
विभाग,औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४०१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २६-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, औरंगाबाद - प्रतिनिधी - डॉ.डी.एस.पारवेकर, सहा.आयुक्त, प.सं. म.अ.ऊ.के.पडेगाव,औरंगाबाद | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - प्रादेशिक पशुसंर्धन सहआयुक्त, औरंगाबाद - प्रतिनिधी - डॉ.एस.एम.नेरळकर, सहा.आयुक्त, प्रा.प.सं.सहआयुक्त कार्यालय, औरंगाबाद | : | उपस्थित |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २०.१०.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. | १७.११.२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | १०.१२.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. | ०८.०१.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | ०३.०३.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी सन १९५० ते १९६० या कालावधीमधील माहिती मागितलेली आहे. जन माहिती तसेच जन अपिलीय अधिकारी यांचे कार्यालय सन १९६० नंतर म्हणजे १९८४ मध्ये निर्माण झाले आहे. त्यामुळे माहिती सहज उपलब्ध होऊ शकली नाही. तथापि माहितीचा कसोशीने शोध घेतला असता, सन १९६० सालच्या काही कागदपत्राच्या प्रती जिल्हाधिकारी कार्यालयातून उपलब्ध झाल्या आहेत. त्या प्रती अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे पाठविल्या आहेत. जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास यापुढे असेही सांगितले की, अपिलार्थी यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडील जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज केल्यास त्यासंदर्भातील माहिती उपलब्ध होणे शक्य आहे.त्याप्रमाणे अपिलार्थीस त्या प्राधिकरणाकडे अर्ज करावा लागेल.

या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील आयोगाच्या स्तरावर बंद करण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २६-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शंकरराव यशवंतराव शेजवळ, बी.एच १/८३, एन-२, एपीआय कॉर्नर, सिडको, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त, औरंगाबाद विभाग, खडकेश्वर,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| कु. जयश्री मोतीराम सोनवणे,<br>रा.सिल्लोड,जि.औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार,सिल्लोड,जि.औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपविभागीय अधिकारी, सिल्लोड,जि.औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४०२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २६-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - तहसीलदार,<br>सिल्लोड,जि.औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - उपविभागीय अधिकारी,<br>सिल्लोड,जि.औरंगाबाद - श्री. पी.बी.खपले | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १८.१२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २८.०१.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १७.०२.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०९.०३.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी दिल्याचे आढळून येत आहे. तथापि अपिलार्थीच्या द्वितीय अपील अर्जाचे अवलोकन केले असता, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण माहिती दिल्याचे नमूद केले आहे. यास्तव अपिलार्थी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांना हे आदेश प्राप्त होताच पंधरा दिवसांच्या आत त्यांना नेमक्या कोणत्या मुद्यावरील माहिती अपूर्ण मिळाली आहे, याबाबत जन माहिती अधिकारी यांना कळवावे व तदनंतर पंधरा दिवसांच्या आत जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीचा मूळ अर्ज विचारात घेऊन त्यासंदर्भात परिपूर्ण माहिती द्यावी लागेल.ही कार्यवाही तीस दिवसांच्या आत पूर्ण करावी लागेल.

या पार्श्वभूमीवर आयोगातर्फे खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी विचाराधीन प्रकरणासंदर्भात वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे अपिलार्थीकडून निवेदन प्राप्त होताच अधिनियमातील तरतुदीस अनुसरुन त्यासंदर्भातील माहिती पंधरा दिवसांच्या आत अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २६-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. कु. जयश्री मोतीराम सोनवणे, रा. हनुमाननगर, एम.एस.ई.बी.च्या पाठीमागे, सिल्लोड, जि.औरंगाबाद.

२.	जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, सिल्लोड, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३.	जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, सिल्लोड, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. अशोक सखाराम वाहुळ, : अपीलकर्ता
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
कारागृह अधीक्षक, मध्यवर्ती कारागृह, हर्सुल,औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
अधीक्षक, मध्यवर्ती कारागृह,औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४०३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २६-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - तुरुंगाधिकारी,श्रेणी-१, मध्यवर्ती कारागृह,हर्सूल,औरंगाबाद- प्रतिनिधी -श्री. बी.सी.निमगडे, तुरुंगाधिकारी श्रेणी-२ | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - अधीक्षक, औरंगाबाद मध्यवर्ती कारागृह, औरंगाबाद | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६.१२.२००९ |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. | १६.०१.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | १८.०१.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | ०९.०३.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत आहे. त्यामुळे सदर प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २६-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अशोक सखाराम वाहुळ,तक्षशीलानगर, हर्सूल कारागृह,स्टाफ क्वॉर्टरच्या मागे (पश्चिम),जटवाडा रोड,औरंगाबाद -४३१ ००३.

२. जन माहिती अधिकारी तथा तुरुंगाधिकारी,श्रेणी-१, मध्यवर्ती कारागृह,हर्सूल,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३.	जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक, औरंगाबाद मध्यवर्ती कारागृह, हर्सूल, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. जयचंद्र श्रीकिशन मोदाणी, : अपीलकर्ता
रा.पैठण, जि.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तालुका कृषि अधिकारी,
कृषि चिकित्सालय,आष्टी, जि.बीड

जन अपिलीय अधिकारी तथा :
तालुका कृषि अधिकारी,
तालुका कृषि कार्यालय,आष्टी, जि.बीड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४०४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २६-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. जयचंद्र श्रीकिशन मोदाणी | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६.१२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २१.०१.२०१० |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १८.०१.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०९.०३.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही. त्यांचे म्हणणे ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत आहे. त्यामुळे सदर प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २६-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. जयचंद्र श्रीकिशन मोदाणी, मु.पो.पाचपिंपळगल्ली, दक्षिण मारोती मंदिराच्या बाजुला,पैठण,जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय,कृषि चिकित्सालय,आष्टी, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी,आष्टी, जि.बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. अर्जुन साहेबराव नवपुते,<br>रा.घारदोंन, ता.जि.औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक,<br>ज्ञानसागर प्राथमिक आश्रम<br>शाळा,खोडेगाव,ता.जि.औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>विशेष समाज कल्याण अधिकारी,<br>औरंगाबाद जिल्हा कार्यालय,औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४०५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २६-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी -मुख्याध्यापक,ज्ञानसागर प्राथमिक आश्रम शाळा,खोडेगाव,ता.जि.औरंगाबाद- श्री. सपकाळ बी.जी. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी -विशेष जिल्हा समाज कल्याण | : | उपस्थित |

अधिकारी,औरंगाबाद जिल्हा कार्यालय,औरंगाबाद- श्री.
पी.बी.बच्छाव

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. | २४.१२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २५.०१.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | १५.०३.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली संपूर्ण माहिती त्यांना दि. २९.०३.२०१० रोजी मुख्याध्यापक,ज्ञानसागर प्राथमिक आश्रम शाळा,खोडेगाव,ता.जि.औरंगाबाद यांनी दिलेली आहे. अपिलार्थीस माहिती मिळाल्याचे पत्र त्यांनी जन अपिलीय अधिकारी तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांना दिलेले आहे व त्याची प्रत राज्य माहिती आयोगाच्या औरंगाबाद खंडपीठाकडे पाठविलेली आहे. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रांवरुन अपिलार्थीस माहिती मिळाल्याचे दिसून येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २६-०४-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अर्जुन साहेबराव नवपुते,रा.घारदोंन, ता.जि.औरंगाबाद

२.	जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,ज्ञानसागर प्राथमिक आश्रम शाळा,खोडेगाव,ता.जि.औरंगाबाद  यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३.	जन अपिलीय अधिकारी तथा विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी,औरंगाबाद जिल्हा कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. दे. म. अकोलकर, : अपीलकर्ता
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, अहमदनगर
जन अपिलीय अधिकारी,
सामान्य प्रशासन विभाग- २, जिल्हा परिषद, अहमदनगर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४०६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २६-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी (तत्कालीन) - कार्यालयीन अधीक्षक, ग्रामपंचायत विभाग,जिल्हा परिषद,अहमदनगर | : | उपस्थित |
| ३.३ | जन माहिती अधिकारी (सध्याचे) - उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रापं),जिल्हा परिषद,अहमदनगर | : | अनुपस्थित |
| ३.४ | जन अपिलीय अधिकारी - अति.मुख्य कार्यकारी अधिकारी, | : | अनुपस्थित |

जिल्हा परिषद, अहमदनगर

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. | १७.०९.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. | ०४.११.२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | १२.११.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. | २८.०१.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २५.०२.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व सध्याचे जन माहिती व अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.तत्कालीन जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधीक्षक यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेली, शनिशिंगणापूर येथे भाविकांना लावलेल्या करासंदर्भातील शासननिर्णयाची प्रत व यासंदर्भातील ग्रामपंचायतीस भाविकांवर कर बसवावा यासंदर्भात शासनाने दिलेल्या निर्णयाची प्रत - ही माहिती अपिलार्थीस दि. ०४.११.२००९ रोजीच्या पत्राद्वारे पाठविलेली आहे. अपिलार्थीस ती प्राप्त झाली आहे व त्याची पोच त्यांच्याकडील अभिलेखामध्ये उपलब्ध आहे. तत्कालीन जन अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत), जि.प.अहमदनगर यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दि. २८.०१.२०१० रोजी निर्णय दिला आहे व त्यामध्ये अपिलार्थीस माहिती मिळाली आहे, असे नमूद केले आहे. अपिलार्थी यांनी मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती त्यांना मिळालेली आहे, असे प्रथम अपील निर्णयावरुन दिसून येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २६-०४-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दे. म. अकोलकर, ३३ (अ),'रेणुका', छत्रपतीनगर,गारखेडा परिसर,औरंगाबाद-४३१ ००५.

२. जन माहिती अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रापं),जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अति.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. लहुजी भाऊराव हिवाळे, : अपीलकर्ता
रा.गुळनिंब, ता.गंगापूर, जि.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसीलदार,
स्वस्त धान्य पुरवठा विभाग,तहसील कार्यालय,गंगापूर,
जि.औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
उपविभागीय अधिकारी,
पुरवठा विभाग,उपविभागीय अधिकारी कार्यालय,वैजापूर,
जि.औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४०७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २६-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, खुलताबाद, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (प.),विभाग, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. बी. बी. सोनवणे, : अपीलकर्ता
रा.औरंगाबाद.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
सार्वजनिक बांधकाम उपविभाग,वैजापूर
जि.औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम)
विभाग,औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४२१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २७-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपविभागीय अभियंता,सार्वजनिक बांधकाम उपविभाग वैजापूर, जि.औरंगाबाद - श्री. के.आर. गाडेकर | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग,औरंगाबाद - प्रतिनिधी- श्री. | : | उपस्थित |

एम.बी.देशपांडे,उपकार्यकारी अभियंता

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. | ०७.१२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | ११.०१.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. | ११.०३.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २०.०३.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी श्री. ठाकुर, कनिष्ठ अभियंता यांच्या कार्यक्षेत्रात एस.आर. व सी.आर.च्या प्रत्येक कामाच्या अंदाजपत्रकाच्या व मोजमापपुस्तिकेच्या दि.०१.०१.२००८ ते दि.३०.११.२००९ या कालावधीच्या प्रती अशी माहिती मागितली आहे व ही माहिती विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे एकत्रित करण्यासाठी काही कालावधी लागला व दि. २०.०७.२०१० रोजी व्यक्तिशः माहिती दिलेली आहे. अपिलार्थी यांनी यासंदर्भात पोच दिलेली आहे. ही बाब जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग,औरंगाबाद यांना दि. २६.०७.२०१० रोजी कळविलेली आहे. अपिलार्थी आज रोजी अनुपस्थित आहेत. तथापि अपिलार्थी यांचे दि. २०.०४.२०११ रोजीचे पत्र आयोगासमोर आहे. त्यामध्ये नमूद केले आहे की, सदर द्वितीय अपील क्र. ४२१/२०१० बाबत संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली आहे. त्यामुळे आयोगाकडे दाखल केलेले विचाराधीन द्वितीय अपील स्वखुषीने मागे घेत आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २७-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. बाजीराव भानुदास सोनवणे, प्लॉट नं. सी.१९,हॉल नं.४-३५-४०२,गल्ली नं.०६, गजानननगर,गारखेडा परिसर,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता,सार्वजनिक बांधकाम उपविभाग वैजापूर, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. सुग्रीव सोपानराव मुंडे,<br>रा.औरंगाबाद. | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>जायकवाडी पाटबंधारे विभाग,नाथनगर (उ),पैठण,जि.औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>जायकवाडी पाटबंधारे विभाग,नाथनगर (उ),पैठण,जि.औरंगाबाद | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४२२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २७-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - लेखापाल, जायकवाडी पाटबंधारे विभाग, नाथनगर (उत्तर),पैठण, जि.औरंगाबाद - प्रतिनिधी - श्री. ए.आर.जाधव, व.लि. | : | उपस्थित |

| | | | |
|---|---|---|---|
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - उपकार्यकारी अभियंता,<br>जायकवाडी पाटबंधारे विभाग,नाथनगर (उत्तर), पैठण,<br>जि.औरंगाबाद - श्री. के.एस.शिंदे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २९.१२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | ०१.०२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | १९.०३.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

प्रकरणात अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांची बाजू ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटते. त्यामुळे सदर प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी अपिलार्थी तसेच जन माहिती अधिकारी,श्री. एस.डी.दौंड यांच्यासह सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**<u>अंतरिम आदेश</u>**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २७-०४-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सुग्रीव सोपानराव मुंडे,पी-४/४/६,विठ्ठलनगर, रामनगर,एन-२,सिडको,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा लेखापाल, जायकवाडी पाटबंधारे विभाग, नाथनगर (उत्तर),पैठण जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग,नाथनगर (उत्तर), पैठण, जि.औरंगाबाद या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. गजानन संतुकराव देशमुख,<br>रा.औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग क्र.१,औरंगाबाद | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता,लघुपाटबंधारे मंडळ,औरंगाबाद | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४२३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २७-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - उपकार्यकारी अभियंता, ल.पा. विभाग क्र.१,औरंगाबाद- श्री. प्र.सि.सरकटे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग क्र.१,औरंगाबाद - श्री. आर.पी.काळे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १७.१२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |

| | | | |
|---|---|---|---|
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | १५.०१.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | १९.०३.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे सन २००८ ते दि.३१.१०.२००९ या कालावधीमध्ये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडून विशेष दुरुस्ती केलेल्या कामाबाबत माहिती मागितलेली आहे. या माहितीसंदर्भात त्यांनी दि. २६.०२.२०१० रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाने कळविले आहे. त्यावेळी त्यांना असेही कळविण्यात आले आहे की, त्रयस्थ पक्ष श्री. काळे यांच्या सन २००८ ते २००९ या कालावधीतील दौरा दैनंदिनीच्या प्रती ही माहिती कार्यालयात येऊन घेऊन जावी, तथापि ही माहिती त्यांनी आतापर्यंत नेलेली नाही. तरी जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण तीस पृष्ठांची माहिती उपलब्ध आहे. ती त्यांना अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे पाठवावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस वरील निर्णयात स्पष्ट केलेली, उर्वरित माहिती हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २७-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. गजानन संतुकराव देशमुख, घ.नं.४६५, गल्ली नं.०४, न्यु हनुमाननगर,गारखेडा परिसर,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, ल.पा. विभाग क्र.१, औरंगाबाद

यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग क्र.१, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शरद बा. कुलकर्णी, : अपीलकर्ता
रा.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर
विभाग,कोल्हापूर

जन अपिलीय अधिकारी तथा :
विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर
विभाग,कोल्हापूर

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४२४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २७-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०९.११.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |

६ प्रथम अपील केल्याची तारीख दि. २४.१२.२००९

७ अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख -

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २३.०३.२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही. त्यामुळे सदर प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २७-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. डॉ. शरद बा. कुलकर्णी,१६७,"बलवंत", ज्योतीनगर,ज्योती मंदिराजवळ,औरंगाबाद - ४३१ ००५.

२. जन माहिती अधिकारी तथा विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर विभाग,कोल्हापूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर विभाग,कोल्हापूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.        निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. सिद्राम महादेव कोळी,<br>रा.औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,पुणे | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४२५ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २७-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - संशोधन अधिकारी,आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,पुणे - श्री. आय.एस.कसबे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - उपसंचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,पुणे - श्री. के.एस.चव्हाण | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०४.०६.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०६.०७.२००९ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. ०७.०७.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०१.०८.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १६.०९.२००९ (पुणे कार्यालयाकडे प्राप्त)<br>दि. २३.०३.२०१० (औरंगाबाद कार्यालयाकडे प्राप्त) |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दि. ०४.०६.२००९ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्या संस्थेमधील कार्यरत काही कर्मचारी/अधिकाऱ्यांच्या संदर्भात व कामकाजाबाबत काही माहिती व्यक्तिशः मागितली आहे. अपिलार्थीस दि. ०६.०७.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्रतिपृष्ठ ₹२/- याप्रमाणे ₹ ७८/- इतक्या शुल्काचा भरणा करुन कार्यालयात उपस्थित राहून माहिती घेऊन जावी, असे कळविले होते.जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन दि. ०१.०८.२००९ रोजी, जन माहिती अधिकारी यांनी माहितीसंदर्भात दिलेला निर्णय योग्य आहे, असा निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील फेटाळले आहे. आज सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे व्यक्तिशः माहिती मागितली आहे व ती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध आहे, असे जन माहिती अधिकारी यांनी कळविले आहे, असे आयोगास आढळून येत आहे. यासर्व बाबी विचारात घेता जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेली संपूर्ण ४० पृष्ठांची माहिती अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठविण्यात यावी, असे आयोगाचे मत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागितलेली संपूर्ण माहिती वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच नोंदणीकृत टपालाद्वारे तीस दिवसांच्या आत विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २७-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सिद्राम महादेव कोळी, प्लॉट नं.टी-१८,प्रतापनगर,सुरजपार्क जवळ, शहानुरवाडी, औरंगाबाद - ४३१००५.

२. जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी,आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,पुणे यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. रघुनाथ धोंडीनाथ चंद्रहास,<br>रा.मिसारवाडी,औरंगाबाद | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>उपअभियंता,लघुपाटबंधारे (स्था.स्तर) उपविभाग,अंबड,<br>जि.जालना | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,लघुपाटबंधारे<br>(स्था.स्तर)विभाग,जालना | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४२६ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २७-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १६.१०.२००९ |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. | १६.१०.२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. | २९.०१.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. | २३.०२.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २३.०३.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी स्वतः अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येत आहे की, अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे जालना जिल्हयातील अंबड उपविभागातील दि. ०१.०१.२००७ ते ३०.०५.२००७ या कालावधीतील एकंदर १५ पाझर तलावाच्या कामाचे मजूरांचे हजेरीपत्रक,रोख पुस्तिका,मोजमाप पुस्तिका व वरिष्ठांनी पाया तपासणी केलेल्या अहवालाच्या छायांकित प्रती मागितल्या आहेत. अपिलार्थी हे दारिद्रयरेषेखालील व्यक्ती नाहीत. जन माहिती अधिकारी यांनी दि. १६.१०.२००९ रोजी अपिलार्थीस माहितीकरिता शुल्क ₹२२००/-इतके कार्यालयात भरणा करावे व त्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल, असे कळविले आहे. अपिलार्थी यांनी या शुल्काचा भरणा केल्याचे आढळून येत आहे. शुल्काचा भरणा केल्यानंतरही जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,लघुपाटबंधारे (स्था.स्त.) उपविभाग अंबड यांनी कार्यकारी अभियंता,ल.पा.(स्था.स्तर) विभाग,जालना यांना दि. २४.११.२००९ रोजीच्या पत्राद्वारे ₹११००/-इतका निधी पुरविण्यात यावा, असे कळविले आहे. त्याची प्रत अपिलार्थीस दिली आहे. ही बाब आयोगास योग्य वाटत नाही. अपिलार्थी यांनी शुल्काचा भरणा केल्यानंतर त्यांना माहिती त्वरित देणे आवश्यक आहे. आज सुनावणीस अपिलार्थी,जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्वजण अनुपस्थित असल्यामुळे प्रकरणाची सद्यस्थिती आयोगास अवगत होऊ शकत नाही. यास्तव या प्रकरणाकडे मुख्य अभियंता,लघुपाटबंधारे (स्था.स्तर) म.रा.पुणे यांना व्यक्तिशः पहावे लागेल व संबंधित जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती अद्याप दिली नसल्यास त्यांना विनामूल्य द्यावी लागेल. त्याचबरोबर अपिलार्थीने भरणा केलेल्या शुल्काची संपूर्ण रक्कम परत करावी लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती अद्याप दिली नसल्यास विनामूल्य द्यावी. त्याचबरोबर अपिलार्थीने भरणा केलेल्या शुल्काची संपूर्ण रक्कम परत करावी. ही कार्यवाही आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी. यासंदर्भात मुख्य अभियंता,ल.पा.(स्था.स्त.)म.रा.पुणे यांनी व्यक्तिशः लक्ष घालावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २७-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---------------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रघुनाथ धोंडीराथ चंद्रहास,रा.मिसारवाडी,नाथगल्ली,पोस्ट नारेगाव,नव्या मोंढयासमोर,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता,लघुपाटबंधारे (स्था.स्तर) उपविभाग,अंबड, जि.जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,लघुपाटबंधारे (स्था.स्तर) विभाग,जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य अभियंता,ल.पा.(स्था.स्त.)महाराष्ट्र राज्य, प्रादेशिक कार्यालय,बंगला नं.१२,पुणे ३ ६ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. लक्ष्मण भिकाजी आव्हाड, : अपीलकर्ता
रा.रांजणगाव शेणपुंजी, ता.गंगापूर, जि.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामसेवक,ग्रामपंचायत कार्यालय,खंडाळा,ता.वैजापूर,
जि.औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
गट विकास अधिकारी, पंचायत
समिती,वैजापूर,जि.औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४२७ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २७-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - ग्रामसेवक,ग्रामपंचायत,रांजणगाव शेणपुंजी, ता.गंगापूर,जि.औरंगाबाद- श्री. एस.बी.गोरे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - विस्तार अधिकारी (पं.),पंचायत समिती,गंगापूर,जि.औरंगाबाद- श्री.एस.डी.चव्हाण | : | उपस्थित |
| ३.४ | गट विकास अधिकारी,पंचायत समिती, गंगापूर, जि. | : | उपस्थित |

औरंगाबाद - श्रीमती संघरत्ना खिल्लारे

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. | २३.१२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. | २८.०१.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २३.०३.२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी व गट विकास अधिकारी, पंचायत समिती,गंगापूर,जि.औरंगाबाद उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी एकूण १८ मुद्यांवर सन २००१ ते अपिलार्थीने अर्ज सादर करण्याच्या तारखेपर्यंत या विस्तृत कालावधीची मोठया स्वरुपाची माहिती मागितलेली आहे. ही माहिती संकलीत करण्यास काही कालावधी लागला. अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात माहिती उपलब्ध असून येऊन पाहणी करावी, असे दि. ०७.०१.२०१० रोजीच्या पत्राद्वारे कळविले आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर दि. ११.०३.२०१० व १९.०३.२०१० रोजी सुनावणी घेऊन सदर माहिती ग्रामपंचायतीमध्ये उपलब्ध असून अपिलार्थीने अवलोकन करावी, असा निर्णय दिला आहे. त्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी पुन्हा अपिलार्थीस दि. ११.०३.२०१० रोजीच्या पत्राद्वारे कळविले आहे की, त्यांच्या कार्यालयात दि. ३१.०३.२०१० व ०१.०४.२०१० या दिवशी कार्यालयात येऊन कागदपत्रांची पहाणी करावी व आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या प्रती देण्यात येतील. जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) प्रमाणे योग्य आहे. अपिलार्थी यांनी या पत्रास प्रतिसाद दिलेला नाही. याकरिता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुन्हा एक संधी देण्यासाठी अपिलार्थीस एक दिवस (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) निश्चित करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावे लागतील व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्या लागतील. अपिलार्थीस याबाबत नोंदणीकृत टपालाद्वारे सूचित करावे लागेल. यास्तव सदरचे प्रकरण आयोगाच्या स्तरावर बंद करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २७-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. लक्ष्मण भिकाजी आव्हाड, रा. रांजणगाव शेणपुंजी, पो. घाणेगाव, ता. गंगापूर, जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,ग्रामपंचायत,रांजणगाव शेणपुंजी, ता. गंगापूर,जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं.),पंचायत समिती, गंगापूर, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. रविंद्र बळीराम मोरे, : अपीलकर्ता
रा.साळेगाव,ता.कळमनुरी,जि.हिंगोली

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय,हिंगोली

जन अपिलीय अधिकारी तथा :
जिल्हा पुरवठा अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय,हिंगोली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/८०३ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २७-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी,जिल्हाधिकारी कार्यालय,हिंगोली - श्री. एन.बी.ठाकूर | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - जिल्हा पुरवठा अधिकारी, हिंगोली | : अनुपस्थित |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. | ३०.११.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. | १६.१२.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. | १५.०१.२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २२.०२.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. त्यांची बाजू ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटते. त्यामुळे सदर प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २७-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रविंद्र बळीराम मोरे, रा.साळेगाव,पो.सांडस,ता.कळमनुरी,जि.हिंगोली

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी,जिल्हाधिकारी कार्यालय,हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, हिंगोली यांना या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. साईनाथ मारोतराव पतंगे,<br>रा.वसमत,जि.हिंगोली | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>तालुका कृषि अधिकारी कार्यालय, वसमत,<br>जि.हिंगोली. | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी, वसमत,<br>जि.हिंगोली. | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/१४२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २८-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - मंडळ कृषि अधिकारी, वसमत, जि.हिंगोली - श्री. एजाज अहमद खान | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तालुका कृषि अधिकारी, वसमत, जि.हिंगोली, श्री.काळे डी.बी. | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०४.१०.२०१० |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | १६.११.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | १८.०१.२०११ |

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दि. ०४.०३.२०११ रोजी आयोगापुढे ठेवण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यापैकी कोणीही उपस्थित नव्हते. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आवश्यक ठरत असल्याने सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती. विचाराधीन प्रकरणात आज सुनावणी घेण्यात आली.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.१ शी संबंधित माहितीच्या प्रती देण्यात आल्या आहेत. उर्वरित मुद्यांशी संबंधित माहिती विस्तृत स्वरुपात असल्यामुळे प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थीस दाखविण्यात आली आहे. याबाबतची नोंद प्रथम अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी यांनी प्रथम अपिलाच्या निर्णयामध्ये घेतलेली आहे. त्यांनी आयोगास पुढे असेही सांगितले की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीची कागदपत्रे एकत्रित केल्यानंतर एकूण सहा मोठे गठ्ठे तयार झाले असून त्यामध्ये अंदाजे १०,००० पृष्ठांची माहिती होत आहे. ही सर्व माहिती त्यांनी आयोगास आज सुनावणीच्यावेळी अवलोकनास्तव सादर केली. त्यामुळे अशी विस्तृत स्वरुपाच्या माहितीची कागदपत्रे पाहणीसाठी उपलब्ध करुन देण्याचा जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार योग्य ठरत आहे. अपिलार्थी आज अनुपस्थित आहेत. तथापि आयोगापुढे केलेला युक्तिवाद व आयोगास सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन अपिलार्थीस माहिती मिळाल्याचे दिसून येते.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## <u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २८-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. साईनाथ मारोतराव पतंगे,शहरपेठ ब्राम्हणगल्ली, वसमत, ता.वसमत,जि.हिंगोली

२. जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, वसमत, जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, वसमत, जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. श्रीनिवास बालाप्रसाद हरब्यासी, : अपीलकर्ता
रा.वसमत, जि.हिंगोली

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
महाराष्ट्र राज्य विद्युत कंपनी, परिमंडळ कार्यालय,
नांदेड
जन अपिलीय अधिकारी, :
महाराष्ट्र राज्य विद्युत कंपनी, परिमंडळ कार्यालय,
नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/२८९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २८-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी -कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, परिमंडळ कार्यालय,नांदेड - श्री. यु.एन.कदम | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, परिमंडळ कार्यालय,नांदेड- श्री. एस.डी. शिंदे | : | उपस्थित |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. | २१.०६.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. | २४.०७.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | १३.१०.२०१० |

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दि. ०१.०३.२०११ रोजी आयोगापुढे ठेवण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यापैकी कोणीही उपस्थित नव्हते. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आवश्यक ठरत असल्याने सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती. विचाराधीन प्रकरणात आज सुनावणी घेण्यात आली.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, परिमंडळ कार्यालय, नांदेड यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, संबंधित हिंगोली विभागाचे कार्यकारी अभियंता जन अपिलीय अधिकारी (FAA)होतात व सहायक अभियंता, वसमत जन माहिती अधिकारी (Deemed PIO)होतात. तथापि परिमंडळ कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २७.०९.२०१० रोजीच्या पत्रान्वये माहिती दिली आहे. अपिलार्थीस मुख्य अभियंता कार्यालयात दि. २१.०४.२०११ रोजीच्या पत्राद्वारे माहिती देण्यात आली आहे. ती अपिलार्थी यांनी स्वीकारली असून त्याबाबतची पोच अपिलार्थी यांनी दिलेली आहे. त्याचप्रमाणे दि. २१.०४.२०११ रोजी कार्यालयात संबंधित कागदपत्रेही दाखविण्यात आली आहेत. त्यानंतर दि. २५.०४.२०११ रोजी अतिरिक्त माहिती पाठविण्यात आलेली आहे, असे मुख्य अभियंता यांनी आयोगास सुनावणीच्यावेळी पुढे सांगितले.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व आयोगापुढे असलेल्या कागदपत्रांवरुन अपिलार्थीस माहिती मिळाल्याचे आढळून आले आहे. या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २८-०४-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. श्रीनिवास बालाप्रसाद हरब्यासी, विनकर कॉलनी, वसमत, जि. हिंगोली

२. जन माहिती अधिकारी तथा -कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, परिमंडळ कार्यालय,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, परिमंडळ कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. उत्तम दगडूजी बगाटे,<br>रा.हिंगोली | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>तहसील कार्यालय,हिंगोली. | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, हिंगोली. | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/२९२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. | २८-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. | ०३.०८.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. | १९.०९.२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. | १८.०९.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | ३०.१२.२०१० |

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दि. ०३.०३.२०११ रोजी आयोगापुढे ठेवण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यापैकी कोणीही उपस्थित नव्हते. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आवश्यक ठरत असल्याने सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती. विचाराधीन प्रकरणात आज सुनावणी घेण्यात आली.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यापैकी कोणीही उपस्थित नाही. त्यामुळे सदर प्रकरणाची सुनावणी पुनश्च पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २८-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. उत्तम दगडूजी बगाटे, सिध्दार्थनगर,दुध डेअरीसमोर, हिंगोली,ता.जि.हिंगोली

२. जन माहिती अधिकारी, तहसील कार्यालय,हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. जावळे दिलीपकुमार विठ्ठलराव,<br>रा.सेनगाव,जि.हिंगोली | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>जिल्हाधिकारी कार्यालय,हिंगोली | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हाधिकारी,<br>जिल्हाधिकारी कार्यालय,हिंगोली | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/२९८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २८-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. जावळे दिलीपकुमार विठ्ठलराव | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २८.०५.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ३०.०६.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | - |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ११.०८.२०१० |

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दि. ०३.०३.२०११ रोजी आयोगापुढे ठेवण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी उपस्थित होते. जन माहिती व अपिलीय अधिकारी यापैकी कोणीही उपस्थित नव्हते. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेणे आवश्यक ठरत असल्याने सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती. विचाराधीन प्रकरणात आज सुनावणी घेण्यात आली.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित आहेत.जन माहिती व अपिलीय अधिकारी पुन्हा अनुपस्थित आहेत. त्यामुळे प्रकरणाची सद्यस्थिती आयोगास अवगत होऊ शकत नाही. ही बाब जिल्हाधिकारी यांच्या नजरेस आणून देण्यात येत आहे. तसेच सदर प्रकरणाची सुनावणी पुनश्च पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २८-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. जावळे दिलीपकुमार विठ्ठलराव, रा.समता कॉलनी,सेनगाव,ता.सेनगाव,जि.हिंगोली

२. जन माहिती अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हाधिकारी, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५.        निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. रविंद्र बळीराम मोरे,<br>रा. साळेगांव, पो. सांडस, तालुका कळमनुरी,<br>जिल्हा हिंगोली | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, कळमनुरी, तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४२८ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २८-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, कळमनुरी, तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०५-०८-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १८-०९-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०९-०९-२०१० |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २९-११-२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कळमनुरी यांच्याकडे केंद्र व राज्य शासनाच्या विविध विकास योजना नावांची यादी, मिळालेला निधी व त्याचे वाटप कामनिहाय, ग्रामपंचायतनिहाय, ग्रामपंचायतीने वर्षनिहाय घेतलेल्या ठरावाच्या व दाखल केलेल्या अभिलेख्याच्या प्रती व केलेल्या कामाच्या मोजमाप नोंदी देण्यात आलेल्या रक्कमा इत्यादी विविध सन २००८ ते २०१० या दरम्यानची विस्तृत माहिती मागितली आहे. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कळमनुरी यांनी त्यांच्या दिनांक १८-०९-२०१० रोजीच्या पत्राने अपिलार्थीस त्यांना योजनांपैकी कोणत्या योजनेची माहिती हवी आहे असा स्पष्ट उल्लेख दिला नाही असे कळवून व ग्रामपंचायत स्तरावरील माहिती संबंधित ग्रामसेवकाकडून घ्यावी असे कळवून प्रकरण बंद केलेले आहे.

या प्रकरणात उपलब्ध कागदपत्रावरुन प्रथम अपिलावर निर्णय झाला असल्याचे आढळून येत नाही. या पार्श्वभूमीवर जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०९-०९-२०१० रोजीच्या प्रथम अपिलाची सुनावणी घेणे आयोगास आवश्यक वाटते. याकरिता सदरचे प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०९-०९-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन निर्णय पारीत करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २८-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रविंद्र बळीराम मोरे, रा. साळेगांव, पो. सांडस, तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, कळमनुरी, तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३.	जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.	निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. सुभाष रामराव कदम, : अपीलकर्ता
मु. पो. करंजाळा (बाराशिव), तालुका वसमत,
जिल्हा हिंगोली

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
बी. रघुनाथ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
बोराळकरनगर, जिंतूर रोड, परभणी

जन अपिलीय अधिकारी तथा :
सहायक संचालक, उच्च शिक्षण, नांदेड विभाग, नांदेड

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४२९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २८-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>प्राचार्य, बी. रघुनाथ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,<br>बोराळकरनगर, जिंतूर रोड, परभणी | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विभागीय शिक्षण सह संचालक, उच्च शिक्षण, नांदेड विभाग, नांदेड<br>- प्रतिनिधी - श्री. दीपक देशपांडे, लघुलेखक उच्च श्रेणी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २६-१०-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. १०-११-२००९ |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २२-१२-२००९ |

| | | | |
|---|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. | ०४-०१-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २८-०१-२०१०<br>फेरसादर दिनांक<br>१५-०३-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी त्रयस्थ डॉ. कैलास पाटील यांच्याबाबत एकूण सात मुद्दयांवर माहिती मागितली आहे. ती त्यांना आतापर्यंत देण्यात आलेली नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जासंदर्भात अपिलार्थीस दिनांक ०४-०१-२०१० रोजी कळविले आहे की, सदरची संस्था ही सार्वजनिक विश्वस्त संस्था म्हणून नोंदणीकृत आहे तथापि या संस्थेअंतर्गत कार्यरत असलेल्या शासकीय अनुदानित महाविद्यालयांना हा अधिनियम लागू होते किंवा नाही याबाबत साशंकता आहे. सदर संस्थेच्या विचारधीन बी. रघुनाथ महाविद्यालय, परभणी यांना शासकीय अनुदान उपलब्ध आहे या पार्श्वभूमीवर आयोगाचे मत असे आहे की, या महाविद्यालयास माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदी लागू होतात. याकरिता अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहिती बाबत प्रथम अपिलीय अधिकारी तथा विभागीय शिक्षण सह संचालक, उच्च शिक्षण, नांदेड विभाग, नांदेड यांना या अपील अर्जावर पुन्हा सुनावणी घ्यावी लागेल. अपिलार्थी यांनी त्रयस्थाची माहिती मागितली आहे त्यामुळे कलम ११ खाली त्रयस्थांना त्यांची बाजू मांडण्याची संधी द्यावी लागेल व यानंतर अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती देय होत असल्यास त्याप्रमाणे निर्णय घ्यावा लागेल. यास्तव सदरचे प्रकरण जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे सुनावणी घेण्यास्तव परत पाठविण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय शिक्षण सह संचालक, उच्च शिक्षण, नांदेड विभाग, नांदेड यांनी अपिलार्थीच्या दिनांक २२-१२-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन निर्णय पारीत करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २८-०४-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. सुभाष रामराव कदम, मु. पो. करंजाळा (बाराशिव), तालुका वसमत, जिल्हा हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, बी. रघुनाथ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, बोराळकरनगर, जिंतूर रोड, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक संचालक, उच्च शिक्षण, नांदेड विभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. संतोष यल्हाजी बांगर, : अपीलकर्ता
मंगळवारा बाजार, हिंगोली, तालुका जिल्हा हिंगोली

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तहसीलदार, तहसील कार्यालय, औंढा नागनाथ, तालुका औंढा नागनाथ, जिल्हा हिंगोली

जन अपिलीय अधिकारी तथा :
उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४३० | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २८-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, औंढा नागनाथ, तालुका औंढा नागनाथ, जिल्हा हिंगोली<br>- प्रतिनिधी - श्री. ए. एस. छडीदार, नायब तहसीलदार (निवडणूक) | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली | : अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १७-०६-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | -- |

| | | | |
|---|---|---|---|
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. | ०७-०९-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. | १२-१०-२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | १९-०१-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांना माहिती देण्यात आलेली नाही. जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, वसमत यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दिनांक १२-१०-२००९ रोजी सुनावणी घेऊन दिनांक २१-१०-२००९ पर्यंत विनाशुल्क माहिती देण्याचे निर्देश दिले होते असे उपलब्ध कागदपत्रावरुन आयोगास आढळून येत आहे. अपिलार्थीस ही माहिती देय होत आहे. याकरिता जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, औंढा यांना आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत ही माहिती अपिलार्थीस द्यावी लागेल. त्याचप्रमाणे आजमितीपर्यंत माहितीच्या विचाराधीन अर्जाची माहिती अपिलार्थीस देण्यात आली नाही याची गंभीर दखल आयोग घेत असून या विलंबासाठी जबाबदार असलेले जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, औंढा नागनाथ, जिल्हा हिंगोली व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे अधिकारी / कर्मचारी यांना एकत्रित २५००० रुपये शास्ती कलम २० (१) प्रमाणे का लावण्यात येऊ नये याचा खुलासा कलम २० (१) च्या परंतुकानुसार हीच कारणे दाखवा नोटीस समजून त्यांना आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत जिल्हाधिकारी, हिंगोली यांच्यामार्फत आयोगास सादर करावा लागेल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेली माहिती अपिलार्थीस आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाने पाठवावी.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, औंढा नागनाथ, जिल्हा हिंगोली व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे अधिकारी / कर्मचारी यांना एकत्रित २५००० रुपये शास्ती कलम २० (१) प्रमाणे का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी आयोगास हीच कारणे दाखवा नोटीस समजून आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत जिल्हाधिकारी, हिंगोली यांच्यामार्फत सादर करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २८-०४-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. संतोष यल्हाजी बांगर, मंगळवारा बाजार, हिंगोली, तालुका जिल्हा हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, औंढा नागनाथ, तालुका औंढा नागनाथ, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी, उप विभागीय अधिकारी कार्यालय, वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. दिलीप कुंडलिक साठे,<br>मु. पारडा, पो. बासंबा, तालुका जिल्हा हिंगोली | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी,<br>जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी,<br>जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४३१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. | २८-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी,<br>जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २४-०९-२००९ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | १८-११-२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | १८-१२-२००९<br>फेरसादर दिनांक<br>२५-११-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन या प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली यांनी सुनावणी घेतल्याचे आढळून येत नाही. या पार्श्वभूमीवर जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली यांनी अपिलार्थीच्या दिनांक १८-११-२००९ रोजीच्या प्रथम अपिलाची सुनावणी घेणे आयोगास आवश्यक वाटते. याकरिता सदरचे प्रकरण जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली यांनी अपिलार्थीच्या दिनांक १८-११-२००९ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत सुनावणी घेऊन निर्णय पारीत करावा.

**(दी. बा. देशपांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

**औरंगाबाद**
**दिनांक २८-०४-२०११**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. दिलीप कुंडलिक साठे, मु. पारडा, पो. बासंबा, तालुका जिल्हा हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी, जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. रमेश पुरभाजी यादव, : अपीलकर्ता

रा. बोरजा, पो. येहळेगांव (सोळंके), तालुका औंढा नागनाथ, जिल्हा हिंगोली

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी

नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, औंढा नागनाथ, तालुका औंढा नागनाथ, जिल्हा हिंगोली

जन अपिलीय अधिकारी तथा :

तहसीलदार, तहसील कार्यालय, औंढा नागनाथ, तालुका औंढा नागनाथ, जिल्हा हिंगोली

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४३२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २८-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. रमेश पुरभाजी यादव | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, औंढा नागनाथ, तालुका औंढा नागनाथ, जिल्हा हिंगोली<br>- प्रतिनिधी - श्री. ए. एस. छडीदार, नायब तहसीलदार (निवडणूक) | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, औंढा नागनाथ, तालुका औंढा नागनाथ, जिल्हा हिंगोली<br>- प्रतिनिधी - श्री. आर. आर. सदिवाल, लिपिक | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०१-०७-२०१० |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २६-०८-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. | १३-०९-२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | २३-११-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन दिनांक १३-०९-२०१० रोजी निर्णय दिला आहे की, अपिलार्थीस त्यांनी मागणी केल्याप्रमाणे तहसील कार्यालय औंढा नागनाथ येथील आस्थापना, लेखा शाखा, नैसर्गिक आपत्ती व संकीर्ण विभाग अभिलेख्याची पाहणी द्यावी. तथापि त्याप्रमाणे पाहणी दिल्याचे आढळून येत नाही. यास्तव जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागितलेली संपूर्ण माहिती माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) च्या तरतुदीन्वये त्यांच्या कार्यालयात पाहणीसाठी अपिलार्थीस नोंदणीकृत पत्राने कळवून एक दिवस सुनिश्चित करुन अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी लागेल व पाहणीनंतर त्यातील काही कागदपत्रांची अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्या लागतील.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहिती-संदर्भातील सर्व अभिलेखे त्यांच्या कार्यालयात पहाणीसाठी एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे छायांकीत करुन देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** — **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २८-०४-२०११** — **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रमेश पुरभाजी यादव, रा. बोरजा, पो. येहळेगांव (सोळंके), तालुका औंढा नागनाथ, जिल्हा हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, औंढा नागनाथ, तालुका औंढा नागनाथ, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, औंढा नागनाथ, तालुका औंढा नागनाथ, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. शेख अतिक शेख लाल,<br>युवा जिल्हा उपाध्यक्ष, समाजवादी पार्टी, हिंगोली, नवीन पाण्याच्या टाकीजवळ, पलटन, हिंगोली | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी तथा<br>विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी कार्यालय, हिंगोली | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विभागीय समाजकल्याण अधिकारी कार्यालय, लातूर विभाग, लातूर | : | |
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४३३ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २८-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी कार्यालय, हिंगोली<br>- श्री. टी. डी. बरगे | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>विभागीय समाजकल्याण अधिकारी, लातूर विभाग, लातूर<br>-प्रतिनिधी - श्री. बी. जी. अरवत, समाजकल्याण अधिकारी | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १९-०८-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. २१-०९-२०१० |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २३-११-२०१० |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक १९-०८-२०१० च्या मूळ अर्जान्वये एकूण चार मुद्दयांवर माहिती मागितली आहे. त्यांच्याकडे दोन मुद्दयावरील माहिती उपलब्ध होती, ती त्यांनी दिनांक ०७ सप्टेबर २०१० रोजी म्हणजे विहित मुदतीत दिली आहे. उर्वरीत दोन मुद्दयावरील माहिती गृहपाल, मागासवर्गीय मुलांचे वस्तीगृह, वसमत, कळमनुरी, हिंगोली व मुलींचे वस्तीगृह, हिंगोली अशा चार वस्तीगृहांकडून प्राप्त करुन घेण्यात आली आहे. दिनांक २०-११-२०१० रोजी ही माहिती प्राप्त झाली व त्यानंतर ती दिनांक ०२-१२-२०१० रोजी संबंधितास देण्यात आली आहे व त्याची पोच अपिलार्थीने दिलेली आहे. माहिती वेळेत देण्याचा प्रयत्न करण्यात आला, तथापि माहिती इतर कार्यालयाशी संबंधित असल्याने अपिलार्थीस माहिती देण्यास विलंब झाला. जन माहिती अधिकारी तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, हिंगोली यांना इतर कार्यालयाकडील माहिती असल्यास पाच दिवसाच्या आत तसे त्यांना कळविण्याची तसदी भविष्यात घ्यावी लागेल, कारण याबाबत प्रकरणात विलंब झालेला आढळून येत आहे. अपिलार्थी यांनी व्दितीय अपील दिनांक २०-११-२०१० रोजी केलेले आहे व अपिलार्थी यांना माहिती ०२-१२-२०१० रोजी प्राप्त झाली आहे, या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २८-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख अतिक शेख लाल, युवा जिल्हा उपाध्यक्ष, समाजवादी पार्टी, हिंगोली, नवीन पाण्याच्या टाकीजवळ, पलटन, हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी कार्यालय, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय समाजकल्याण अधिकारी, लातूर विभाग, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. नारायण गुलाबचंद बन्सवाल, : अपीलकर्ता
रा.औरंगाबाद.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
सह दुय्यम निबंधक वर्ग-२,
औरंगाबाद क्र.१,औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी तथा :
सह जिल्हा निबंधक वर्ग-१,
औरंगाबाद तथा मुद्रांक जिल्हाधिकारी,औरंगाबाद

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४३४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २८-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी - श्री. नारायण गुलाबचंद बन्सवाल | : | उपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - सह दुय्यम निबंधक वर्ग-२,औरंगाबाद क्र.१,औरंगाबाद- प्रतिनिधी- श्री. एस.बी.खिस्ते, लिपीक | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - सह जिल्हा निबंधक वर्ग-१ औरंगाबाद तथा मुद्रांक जिल्हाधिकारी,औरंगाबाद- श्री.जी. बी. कुऱ्हाडे | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०२.०७.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ३१.०७.२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २७.०१.२०१० |

७ अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख दि. ०३.०३.२०१०

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २५.०३.२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी चार मुद्यांवर माहिती मागितली आहे. त्या माहितीचे अभिलेखे पुणे येथील कार्यालयात स्कॅनिंगसाठी गेले असल्यामुळे देऊ शकले नाहीत. पुणे कार्यालयाकडून आता ते उपलब्ध झाले आहेत. त्यातील काही कागदपत्रे सोबत आणण्यात आली आहेत. ती देण्यास ते तयार आहेत. आयोगाने सूचित केल्याप्रमाणे त्यांच्या सोबत आणण्यात आलेली कागदपत्रे अपिलार्थीस सुनावणीमध्ये हस्तांतरित करण्यात आली व अपिलार्थी यांनी ती स्वीकारली. अपिलार्थी यांना या कागदपत्रांची पाहणी करावी लागेल व ती कागदपत्रे त्यांच्या मूळ अर्जाप्रमाणे आहेत किंवा कसे, याबाबतची पडताळणी करावी लागेल. नसल्यास त्यासंदर्भात त्यांचे म्हणणे जन माहिती अधिकारी यांच्या निदर्शनास पंधरा दिवसांचे आत आणून द्यावेत.

या पार्श्वभूमीवर हे आदेश आयोगाचे अंतरिम आदेश समजण्यात यावेत. या अपिलाची सुनावणी पुन्हा घेण्यात येईल, त्यावेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना व्यक्तिशः उपस्थित राहावे लागेल. सुनावणीची पुढील तारीख यथावकाश कळविण्यात येईल.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**अंतरिम आदेश**

१) जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने त्यांना कळविल्यानंतर उर्वरित माहितीच्या साक्षांकित प्रती अपिलार्थीस एक महिन्याच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवाव्यात.

२) पुढील सुनावणीची तारीख यथावकाश कळविण्यात येईल.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २८-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नारायण गुलाबचंद बन्सवाल,५-११-२०, रामदेवनगर,पदमपुरा, औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निबंधक वर्ग-२,औरंगाबाद क्र.१,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक,वर्ग-१ औरंगाबाद तथा मुद्रांक जिल्हाधिकारी,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. हारसिंग कोंडीराम गुसिंगे, : अपीलकर्ता
रा.शेवगा,ता.जि.औरंगाबाद

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
तलाठी,
सजा गाढेजळगाव, ता.जि.औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी तथा :
नायब तहसीलदार,महसूल विभाग,
तहसील कार्यालय,औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०१०/रामाआ/अपील/सिआर/४३५ | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २८-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | |
| ३.१ | अपिलार्थी | : अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - तलाठी,सजा गाढेजळगाव, ता.जि.औरंगाबाद - श्री. प्रदीप कुरुद | : उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - नायब तहसीलदार (महसूल-१), तहसील कार्यालय,औरंगाबाद- श्री. डी.एन.भारस्कर | : उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०२.१२.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ०३.१२.२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ०७.०१.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २८.०१.२०१० |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. २५.०३.२०१०

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी तथा नायब तहसीलदार(महसूल-१) यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहितीसाठीच्या मूळ अर्जाद्वारे त्यांच्या नातेवाईकाचे ७/१२ मधील इतर अधिकारामधील नाव वगळणेबाबतची माहिती मागितली असल्याचे दिसून आले. त्याप्रमाणे माहिती द्यावी, असा निर्णय जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन दि.२८.०१.२०१० रोजी दिलेला आहे. जन माहिती अधिकारी तथा तलाठी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, सदरची कागदपत्रे उपलब्ध आहेत व ते ती अपिलार्थीस देऊ शकतात. जन माहिती अधिकारी यांना ही माहिती अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीशी संबंधित कागदपत्रे अपिलार्थीस हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २८-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. हारसिंग कोंडिराम गुसिंगे, रा.शेवगा,ता.जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा तलाठी सजा,गाढेजळगाव, ता.जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल-१), तहसील कार्यालय,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.		निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | | |
|---|---|---|---|
| | श्री. नदाफ ईस्माईल खान अहमद,<br>मु. पो. चोंढी (बहिरोबा), तालुका वसमत, जिल्हा हिंगोली | : | अपीलकर्ता |
| | **विरुध्द** | | |
| | जन माहिती अधिकारी,<br>उप वनसंरक्षक कार्यालय, परभणी, जायकवाडी रेस्ट हाऊस समोर, परभणी | : | उत्तरवादी |
| | जन अपिलीय अधिकारी तथा<br>उप वनसंरक्षक, उप वनसंरक्षक कार्यालय, परभणी वन विभाग, परभणी, जायकवाडी रेस्ट हाऊस समोर, परभणी | : | |
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/५०१ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २८-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>प्रमुख लेखापाल, परभणी वनविभाग, परभणी<br>- श्री. आर. बी. पाटील | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक वनसंरक्षक, परभणी वन विभाग, परभणी<br>- श्री. डी. एन. शंकरवार | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. ०२-०९-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. ०९-०९-२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०६-१०-२०१० |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ११-०१-२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. २५-०२-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक ०२-०९-२०१० च्या अर्जान्वये अर्जान्वये सन १९८९ ते १९९४ या कालावधीची विस्तृत अशी माहिती मागितली आहे. ही सर्व माहिती ३८ संचिकामध्ये उपलब्ध असून त्याची ३५०० पृष्ठे होत आहेत. याकरिता ७००० रुपये खर्च येत आहे. तथापि अपिलार्थीने ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे प्रमाणपत्र दिले असल्याकारणाने त्यांना त्यांच्या कार्यालयाच्या परभणी वन विभागात उपस्थित राहून माहितीची प्रत्यक्षात पाहणी करावी व आवश्यक असलेल्या माहितीच्या प्रती घ्याव्यात असे अपिलार्थीस दिनांक ०९-०९-२०१० रोजी कळविले आहे. तथापि अपिलार्थी यांनी त्यांच्या दिनांक २७-०९-२०१० च्या पत्रान्वये जन माहिती अधिका-यास कळविले आहे की, त्यांना माहितीच्या झेरॉक्स प्रती पाहिजे आहेत. निरीक्षण नको आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दिनांक ११-०१-२०११ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केला आहे की, माहिती विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे अपिलार्थीने कार्यालयात माहितीची पाहणी करावी व आवश्यकता असल्यास झेरॉक्स प्रती त्यांना देण्याची व्यवस्था करण्यात येईल. अपिलार्थी प्रथम सुनावणीस उपस्थित होते व अपिलार्थीने ही बाब मान्य केली नाही. याकरिता जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णयामध्ये असे नमूद केले आहे की, निधी प्राप्त होताच आपणास माहिती देता येईल. केवळ निधीअभावी माहिती देता येत नाही त्यामुळे प्रकरण निकाली काढण्यात येत आहे.

आयोगापुढे करण्यात आलेला युक्तिवाद व उपलब्ध कागदपत्रावरुन जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वन संरक्षक, परभणी यांनी माहिती विस्तृत स्वरुपाची असल्याकारणाने व निधी उपलब्ध नसल्याकारणाने अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ७ (९) नुसार अभिलेखे पाहण्यासाठी उपलब्ध करुन देणे ही बाब योग्य ठरत आहे. याकरिता जन माहिती अधिकारी तथा प्रमुख लेखापाल, परभणी वनविभाग, परभणी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागितलेली उपरोक्त संपूर्ण माहिती त्यांच्या कार्यालयात पुन्हा एकदा पाहणीसाठी नोंदणीकृत पत्राने कळवून एक दिवस सुनिश्चित करुन अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी लागेल व पाहणीनंतर त्यातील काही कागदपत्रांच्या अपिलार्थीस आवश्यकता असल्यास त्याच्या झेरॉक्स प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्या लागतील.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेल्या माहिती-संदर्भातील सर्व अभिलेखे त्यांच्या कार्यालयात पुन्हा एकदा पहाणीसाठी एक दिवस (वेळ सकाळी ११-०० ते सायं. ०५-००) सुनिश्चित करुन उपलब्ध करुन द्यावेत व या पहाणीनंतर अपिलार्थीस काही आवश्यक असलेली कागदपत्रे छायांकीत करुन देण्याची व्यवस्था करावी. ही प्रक्रिया जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २८-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. नदाफ ईस्माईल खान अहमद, मु. पो. चोंढी (बहिरोबा), तालुका वसमत, जिल्हा हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा प्रमुख लेखापाल, परभणी वनविभाग, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक, परभणी वन विभाग, परभणी
यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. श्रीनिवास बालाप्रसाद हरब्यासी, : अपीलकर्ता
विनकर कॉलनी, वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली
जन अपिलीय अधिकारी तथा :
जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/५३९ | | |
| २ | सुनावणीची तारीख | दि. | २८-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. | २३-११-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. | ३०-११-२०१० |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | दि. | ०१-०१-२०११ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. | ०१-०३-२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी सर्वजण अनुपस्थित आहेत.

निवासी उपजिल्हाधिकारी, हिंगोली यांनी त्यांच्या दिनांक २८-०४-२०११ रोजीच्या पत्रान्वये प्रकरणात सुनावणीसाठी पुढील तारीख मिळण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन अपिलार्थीच्या दिनांक ०१-०१-२०११ रोजीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतल्याचे आयोगास आढळून येत नाही. या पार्श्वभूमीवर जन अपिलीय अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०१-०१-२०११ रोजीच्या प्रथम अपिलाची सुनावणी घेणे आयोगास आवश्यक वाटते. याकरिता सदरचे प्रकरण जन अपिलीय अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन अपिलीय अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०१-०१-२०११ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत सुनावणी घेऊन निर्णय पारीत करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २८-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव
राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. श्रीनिवास बालाप्रसाद हरब्यासी, विनकर कॉलनी, वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. किसन नारायण काशीदे, : अपीलकर्ता
इंदिरा नगर, कळमनुरी, तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, कळमनुरी,
तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली
जन अपिलीय अधिकारी तथा :
तहसीलदार, तहसील कार्यालय, कळमनुरी, तालुका कळमनुरी,
जिल्हा हिंगोली

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/५६४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २८-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, कळमनुरी,<br>तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार, तहसील कार्यालय, कळमनुरी,<br>तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १०-११-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २१-१२-२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | | -- |

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०३-०३-२०११

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी अथवा त्यांचे कोणीही प्रतिनिधी उपस्थित नाहीत.

आयोगापुढे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन अपिलार्थीच्या दिनांक २१-१२-२०१० रोजीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतल्याचे आयोगास आढळून येत नाही. या पार्श्वभूमीवर तहसीलदार, कळमनुरी, तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली यांनी अपिलार्थीच्या दिनांक २१-१२-२०१० रोजीच्या प्रथम अपिलाची सुनावणी घेणे आयोगास आवश्यक वाटते. याकरिता सदरचे प्रकरण तहसीलदार, कळमनुरी, तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली यांच्याकडे परत पाठविण्यात येत आहे.

अतः आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, कळमनुरी, तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली यांनी अपिलार्थीच्या दिनांक २१-१२-२०१० रोजीच्या प्रथम अपील अर्जावर आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत सुनावणी घेऊन निर्णय पारीत करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २८-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. किसन नारायण काशीदे, इंदिरा नगर, कळमनुरी, तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, कळमनुरी, तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, कळमनुरी, तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद, बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. आबासाहेब नानाराव भोसले, : अपीलकर्ता

शहरपेठ, भोसले गल्ली, वसमतनगर, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी

उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली

जन अपिलीय अधिकारी तथा :

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, हिंगोली

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/५८२ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २८-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी तथा<br>उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली<br>- श्री. वसमतकर एस. एफ. | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, हिंगोली - प्रतिनिधी - श्री. कंधारे, वरिष्ठ लिपिक | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १८-०९-२०१० |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | | -- |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १७-११-२०१० |

७ अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख --

८ राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख दि. ०७-०३-२०११

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहितीसाठीच्या अर्जान्वये एकूण चार मुद्दयांवर माहिती मागितली आहे व ती माहिती अपिलार्थीस दिनांक ३०-०९-२०१० रोजी उपलब्ध करुन दिली आहे. प्रत्यक्षात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १७-१०-२०१० पर्यंत माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित होते याची नोंद जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, हिंगोली यांनी त्यांच्या प्रथम अपिलाच्या दिनांक १३-१२-२०१० रोजीच्या निर्णयामध्ये घेतली आहे. तथापि निर्णय ०१-०३-२०११ रोजी निर्गमीत केल्याचे आढळून येत आहे. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी उपस्थित होते असे आढळून येत आहे. अपिलार्थीस माहिती मिळाल्याचे आढळून येत आहे. या सर्व बाबींचे verification जन अपिलीय अधिकारी यांनी व्यवस्थित करणे आवश्यक आहे या पार्श्वभूमीवर आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणात पुन्हा सुनावणी घेऊन यथायोग्य परिस्थितीची नोंद घेऊन प्रथम अपिलावर निर्णय आयोगाचे आदेश प्राप्त होताच एक महिन्याच्या आत पारीत करावा.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २८-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. आबासाहेब नानाराव भोसले, शहरपेठ, भोसले गल्ली, वसमतनगर, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली.

२. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, वसमत, तालुका वसमत, जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. शेख खाजा शेख बने, : अपीलकर्ता
रा.हिंगाली.

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
अध्यक्ष,
राजीव गांधी ऊर्दु प्राथमिक शाळा, वसमतनगर,जि.हिंगोली
जन अपिलीय अधिकारी तथा :
शिक्षणाधिकारी (प्रा.), जिल्हा परिषद,हिंगोली

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/६११ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २८-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी -अध्यक्ष/मुख्याध्यापक, राजीव गांधी ऊर्दू प्राथमिक शाळा, वसमतनगर,जि.हिंगोली | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जि.प.हिंगोली - श्री. शिवाजी पवार | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. १८.०९.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | दि. २०.१२.२०१० |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ३०.११.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १३.१२.२०१० |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०८.०३.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी राजीव गांधी ऊर्दू प्राथमिक शाळा,वसमतकडील एकूण ८ मुद्यांवर माहिती मागितलेली आहे.सदर शाळेस शासनाचे अनुदान आहे. त्यामुळे माहिती अधिकार अधिनियम २००५ ची कलमे त्यांना लागू होतात. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय दिला आहे की, माहितीच्या कागदपत्रांकरिता किती शुल्काची आवश्यकता आहे,याबाबतची माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कळवावी व त्या शुल्काचा भरणा केल्यानंतर अपिलार्थीस माहिती द्यावी. आयोगास उपलब्ध कागदपत्रांवरुन जन माहिती अधिकारी यांनी दि. २९.१२.२०१० रोजी ८५ पृष्ठांची माहिती अपिलार्थीस पाठविल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या द्वितीय अपील अर्जात नमूद केले आहे की, शाळेकडून त्यांना प्राप्त झालेली माहिती अपूर्ण आहे. अपिलार्थी आज अनुपस्थित आहेत. याकरिता अपिलार्थी यांना सूचित करण्यात येत आहे की, त्यांना नेमकी कोणत्या मुद्यासंदर्भात अपूर्ण माहिती मिळाली आहे, याबाबत हे आदेश प्राप्त होताच पंधरा दिवसांच्या आत जन माहिती अधिकारी यांना कळवावे लागेल व तदनंतर त्यासंदर्भात पंधरा दिवसांच्या आत जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीच्या मूळ अर्जासंदर्भाने परिपूर्ण माहिती अपिलार्थीस विनामूल्य द्यावी लागेल.

या पार्श्वभूमीवर आयोगाचे स्तरावर प्रकरण बंद करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २८-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. शेख खाजा शेख बने,बडे मस्जिदजवळ, आजम कॉलनी,हिंगोली,ता.जि.हिंगोली

२. जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष/मुख्याध्यापक, राजीव गांधी ऊर्दू प्राथमिक शाळा,

वसमतनगर,जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जि.प.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. राजेंद्र हनुमंतराव पोतदार, : अपीलकर्ता
रा. वसमत, जि.हिंगोली

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, हिंगोली.
जन अपिलीय अधिकारी तथा :
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, हिंगोली

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/६४० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २८-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, वसमत, जि.हिंगोली | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, हिंगोली - श्री. शिवाजी पवार | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २९.११.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. ३१.१२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. १७.०२.२०११ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १४.०३.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत. अपिलार्थी, जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. त्यांची बाजू ऐकून घेणे आयोगास आवश्यक वाटत आहे. त्यामुळे सदर प्रकरणाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी सर्व संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबी विचारात घेता आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश**

या द्वितीय अपिलाची सुनावणी पुढे ढकलण्यात येत आहे. पुढील सुनावणीची तारीख सर्व संबंधितांना यथावकाश कळविण्यात येईल. पुढील सुनावणीस अपिलार्थी, जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांनी सर्व माहितीनिशी (statement of facts) व्यक्तिशः उपस्थित राहावे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २८-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. ॲड. राजेद्र हनुमंतराव पोतदार, लक्ष्मीनगर, बसस्टँडच्या मागे, वसमत, जि.हिंगोली

२. जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, वसमत, जि.हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. उत्तम दगडूजी बगाटे, : अपीलकर्ता
रा.हिंगाली

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
तहसील कार्यालय,हिंगोली
जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार, तहसील कार्यालय,हिंगोली

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २०११/रामाआ/अपील/सिआर/८२४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २८-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - नायब तहसीलदार (संगायो), तहसील कार्यालय,हिंगोली- श्री. म.सरवर म.उस्मान | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - तहसीलदार, हिंगोली | : | अनुपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | | दि. ०७.११.२०१० |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १६.१२.२०१० |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. २५.०३.२०११ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती त्यांच्या कार्यालयात तयार असून अपिलार्थी यांनी

त्यांच्या मूळ अर्जाद्वारे माहितीची मागणी व्यक्तिश: केली असल्यामुळे त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहून माहिती हस्तगत करावी, असे दि. २४.११.२०१० रोजीच्या पत्राद्वारे कळविलेले आहे व या माहितीकरिता जिल्हाधिकारी यांच्याकडे दि. २६.११.२०१० रोजीच्या पत्राद्वारे निधीची मागणी केली आहे.

अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेऊन जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,हिंगोली यांनी दि. २७.०४.२०११ रोजी निर्णय दिला आहे की, सहा दिवसांच्या आत माहिती देण्यात यावी. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सुनावणीच्यावेळी असे सांगितले की,माहिती विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे छायाप्रतीकरिता ₹३७५०/- खर्च लागणार आहे. यासाठी जन माहिती अधिकारी यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७(९) नुसार एक दिवस (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) निश्चित करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावे लागतील व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्या लागतील. अपिलार्थीस याबाबत नोंदणीकृत टपालाद्वारे सूचित करावे लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

जन माहिती अधिकारी यांनी एक दिवस निश्चित (वेळ सकाळी ११.०० ते सायं.०५.००) करुन अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधित अभिलेखे पाहणीसाठी अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावीत व त्यातून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या काही कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य द्याव्यात. ही कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांचे आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २८-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. उत्तम दगडूजी बगाटे,सिध्दार्थनगर, दुधडेअरीसमोर, हिंगोली

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (संगायो), तहसील कार्यालय,हिंगोली

यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

| | | |
|---|---|---|
| श्री. अशोक राधाकिशन थोटे,<br>रा.हिंगोली | : | अपीलकर्ता |
| **विरुध्द** | | |
| जन माहिती अधिकारी तथा<br>अवर सचिव,<br>सामान्य प्रशासन विभाग, कार्यासन-१७, मंत्रालय,मुंबई | : | उत्तरवादी |
| जन अपिलीय अधिकारी तथा<br>उपसचिव,<br>कार्यासन-१७,सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय,मुंबई | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२१०० | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २८-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - अवर सचिव, सा.प्र.वि.,कार्यासन-१७, मंत्रालय,मुंबई- श्री. विनय द.आठवले | : | उपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - उपसचिव,सा.प्र.वि.,कार्यासन-१७, मंत्रालय,मुंबई - श्री. श्रीकांत पाटील | : | उपस्थित |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | | दि. २०.०३.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | | - |
| ६ | प्रथम अपील केल्याची तारीख | | दि. १०.०५.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | | दि. ३०.०७.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | | दि. १६.१०.२००९<br>(फेरसादर दि.२४.११.२००९) |

या प्रकरणाची सुनावणी यापूर्वी दि. ०१.०३.२०११ रोजी आयोगापुढे ठेवण्यात आली होती. त्यावेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यापैकी कोणीही उपस्थित नव्हते. दोनही बाजूंचे म्हणणे ऐकून घेणे आवश्यक ठरत असल्याने सुनावणी पुढे ढकलण्यात आली होती. विचाराधीन प्रकरणात आज सुनावणी घेण्यात आली.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी अधिकारी/कर्मचारी यांच्या वयाला ४५ वर्षे झाल्यास विभागीय परीक्षेतून सूट देण्यात येते त्याबाबत तसेच सेवा १२ वर्षे पूर्ण झाल्यावर कालबध्द पदोन्नती देण्यात येते याबाबत, एकूण चार मुद्यांद्वारे माहिती मागितली आहे. या मुद्यांपैकी ज्या मुद्यांवरील माहिती, अधिनियमातील तरतुदीनुसार 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येत बसेल, त्या संदर्भातील जी माहिती उपलब्ध होती,ती माहिती अपिलार्थीस दि. १७.०४.२००९ रोजी देण्यात आलेली आहे. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी तथा उपसचिव, सामान्य प्रशासन विभाग, यांनी सुनावणी घेऊन दि. ३०.०७.२००९ रोजी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मागितलेल्या माहितीसंदर्भात मुद्देनिहाय सविस्तर ऊहापोह करुन अपील फेटाळण्याचा निर्णय दिला आहे.

आयोगापुढे केलेला युक्तिवाद व आयोगापुढील कागदपत्रांवरुन अपिलार्थीस देय होत असलेली माहिती त्यांना देण्यात आली असल्याचे दिसून येत आहे

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २८-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

---

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. अशोक राधाकिशन धोटे,पोलीस वायरलेस, राज्य राखीव पोलीस बल गट क्र.१२,नांदेड रोड,हिंगोली

२. जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, सा.प्र.वि.,कार्यासन-१७, मंत्रालय,मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपसचिव,सा.प्र.वि.,कार्यासन-१७ मंत्रालय,मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ औरंगाबाद यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद,
बचत भवन, लेखा व कोषागार कार्यालयाच्या
पाठीमागे, औरंगाबाद-४३१००१

श्री. रविंद्रनाथ विश्वनाथराव बांगर, : अपीलकर्ता
रा.हिंगोली

**विरुध्द**

जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी
हिंगोली नगर परिषद, तृतीय श्रेणी कर्मचारी सहकारी
गृहनिर्माण संस्था मर्या.,हिंगोली.
जन अपिलीय अधिकारी तथा :
सहायक निबंधक, सहकारी संस्था, हिंगोली

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक : २००९/रामाआ/अपील/सिआर/२२७४ | | |
| २ | सुनावणीची तारीख | | दि. २८-०४-२०११ |
| ३ | आज रोजीची उपस्थिती | | |
| ३.१ | अपिलार्थी | : | अनुपस्थित |
| ३.२ | जन माहिती अधिकारी - सचिव, हिंगोली नगर परिषद तृतीय श्रेणी कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या.हिंगोली | : | अनुपस्थित |
| ३.३ | जन अपिलीय अधिकारी - सहायक निबंधक, सहकारी संस्था,ता. हिंगोली - श्री. अ.रा.गिरी | : | उपस्थित |
| ३.४ | त्रयस्थ पक्ष - श्री. रघुनाथ विश्वनाथराव बांगर | : | अनुपस्थित |

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०७.०९.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ०७.१०.२००९ |
| ६ | प्रथम अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. १४.१०.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २५.११.२००९ |
| ८ | राज्य माहिती आयोगाकडे अपील प्राप्त झाल्याची तारीख | दि. ११.१२.२००९ |

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व त्रयस्थ पक्ष अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीच्यावेळी आयोगास अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती दि. ०७.१०.२००९ रोजी पाठविलेली आहे व ती दि. ०९.१०.२००९ रोजी अपिलार्थीस प्राप्त झाली आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी पुढे असेही अवगत केले की, अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर दि. १३.११.२००९ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थीस १ ते ६ ची माहिती त्वरित विनामूल्य द्यावी, असा निर्णय घेतलेला आहे. अपिलार्थी अनुपस्थित आहेत. अपिलार्थीस माहिती मिळाली आहे. अपिलार्थीने दि.०८.१०.२००९ रोजीच्या द्वितीय अपील अर्जामध्ये अपूर्ण,दिशाभूल करणारी व चुकीची माहिती मिळाल्याचे मोघम नमूद केले आहे. अपिलार्थी यांना त्यांना नेमकी अपूर्ण,चुकीची व दिशाभूल करणारी कोणती माहिती मिळाली, हे पंधरा दिवसांच्या आत जन माहिती अधिकारी यांना कळवावे लागेल व पुढील पंधरा दिवसांच्या आत अपिलार्थीच्या मूळ अर्जासंदर्भात उर्वरित माहिती जन माहिती अधिकारी यांना द्यावी लागेल.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून त्यांच्या मूळ अर्जासंदर्भातील अपूर्ण,चुकीची व दिशाभूल करणाऱ्या माहितीसंदर्भात मुद्दे प्राप्त झाल्यानंतर त्या मुद्यांशी संबंधित देय माहिती पुढील पंधरा दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.ही कार्यवाही हे आदेश प्राप्त होताच तीस दिवसांच्या आत पूर्ण करावी.

**(दी. बा. देशपांडे)**

**औरंगाबाद** **राज्य माहिती आयुक्त,**

**दिनांक २८-०४-२०११** **खंडपीठ औरंगाबाद**

-----------------------------------------------------------------------------------------

प्रमाणित साक्षांकीत प्रत

उप सचिव

राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१. श्री. रविंद्रनाथ विश्वनाथ बांगर,मंगळवारा बाजार गेटजवळ, पाण्याच्या टाकीजवळ,हिंगोली

२. जन माहिती अधिकारी तथा सचिव, हिंगोली नगर परिषद तृतीय श्रेणी कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या.,हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था,ता. हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.